CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. १९ जुलै २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ९६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## पुण्याच्या वाहतूक व्यवस्थेत तात्पुरता बदल

पुणे : पुणेकरांसाठी महत्त्वाची बातमी, उद्या म्हणजेच रविवारी १९ जुलै रोजी भगवान जगन्नाथ रथयात्रेनिमित्त शहरातील प्रमुख रस्त्यांवरील वाहतुकीत तात्पुरते बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे दुपारी ३ ते रात्री ८.३० या वेळेत प्रवास करणाऱ्या नागरिकांनी घराबाहेर पडण्यापूर्वी वाहतुकीतील बदल आणि पर्यायी मार्गांची माहिति घेण्याचे आवाहन पुणे वाहतूक पोलिसांनी केले आहे.

भगवान जगन्नाथाची रथयात्रा उद्या दुपारी ३ वाजता एस. पी. महाविद्यालय येथून सुरू होईल. त्यानंतर टिळक रस्ता, बाजीराव रस्ता, शनिपार चौक, नगरकर तालीम, रमणबाग शाळा, ओंकारेश्र्वर मंदिर, बालगंधर्व रंगमंदिर, जंगली महाराज रस्ता, खंडुजीबाबा चौक आणि टिळक चौक मार्गे पुन्हा एस. पी. महाविद्यालय येथे यात्रेची सांगता होईल. रथयात्रेच्या पार्श्र्वभूमीवर टिळक रस्ता, बाजीराव रस्ता आणि लक्ष्मी रस्ता परिसरातील वाहतूक परिस्थितीनुसार वळवण्यात येणार आहे. गर्दी आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहनचालकांनी या मार्गांवर जाणे शक्यतो टाळावे आणि पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## भारताचे पहिले खासगी ऑर्बिटल रॉकेट 'विक्रम-१' अंतराळात झेपावलं

वृत्तसंस्था

हैदराबाद : भारताच्या अंतराळ क्षेत्रासाठी आजचा दिवस ऐतिहासिक ठरला आहे. इस्रोने ४६ वर्षांपूर्वी ज्या श्रीहरिकोटा प्रक्षेपण केंद्रावरून एसएलव्ही-३ रॉकेटचे यशस्वी प्रक्षेपण करून भारताला उपग्रह प्रक्षेपणक्षम राष्ट्रांच्या यादीत स्थान मिळवून दिले होते, त्याच प्रक्षेपणपॅडवरून आज देशातील पहिले खासगी कक्षीय रॉकेट 'विक्रम-१' प्रक्षेपित करून यशस्वीरीत्या कक्षेत पोहोचवले.



या महत्त्वपूर्ण टप्प्यामुळे, खासगीरीत्या कक्षीय प्रक्षेपण क्षमता प्राप्त करणारा भारत हा जगातील तिसरा देश ठरला आहे.आज शनिवारी सकाळी ११.३० वाजता सतीश धवन अंतराळ केंद्र, श्रीहरिकोटा येथील पहिल्या लॉन्च पॅडवरून 'आगमन' मोहिमेअंतर्गत 'विक्रम-१'चे पहिले ऑर्बिटल चाचणी उड्डाण झाले. ४६ वर्षांपूर्वी १८ जुलै १९८० रोजी इस्रोने श्रीहरिकोटा येथून एसएलव्ही-३ रॉकेटचे यशस्वी प्रक्षेपण करून 'रोहिणी आरएस-१' उपग्रह पृथ्वीच्या कक्षेत स्थापित केला होता.

या यशानंतर भारत स्वतःच्या बळावर उपग्रह प्रक्षेपित करणारा जगातील सहावा देश ठरला होता.२२ मीटर उंच, १७ टन वजनाचे, चार टप्प्यांचे आणि पूर्णपणे सॉलिड इंधनावर चालणारे एसएलव्ही-३ हे लो अर्थ ऑर्बिटमध्ये ४० किलोपर्यंतचा पेलोड पोहोचवू शकत होते.

विशेष म्हणजे, तब्बल ४६ वर्षांनंतर ड्ब्त-३ प्रमाणेच, २२ मीटर उंच 'विक्रम-१' या रॉकेटने इस्रोच्या लाँच पॅडवरून उड्डाण घेतले. स्कायरूट एरोस्पेसचे सहसंस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पवन कुमार चंदाना यांनी सांगितले की, इस्रोच्या लॉन्च पॅडवरून उड्डाणे केलेले पहिले खासगी रॉकेट आहे. हा क्षण केवळ आमच्या कंपनीसाठीच नव्हे, तर भारताच्या संपूर्ण खासगी अंतराळ क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.'विक्रम-१'ची वैशिष्ट्ये काय?'विक्रम-१' हे सुमारे सात मजली इमारतीएवढ्या उंचीचे मल्टी-स्टेज लॉन्च व्हेईकल आहे. संपूर्ण रॉकेट कार्बन कॉम्पोझिट संरचनेत तयार करण्यात आले असून, त्यामध्ये स्कायरूटने विकसित केलेली प्रोपल्शन प्रणाली वापरण्यात आली आहे.

यात उच्च क्षमतेचे सॉलिड-फ्यूल बूस्टर आणि ३ऊ-प्रिंटेड इंजिनचा समावेश आहे. हे रॉकेट ३५० किलोग्रॅमपर्यंत वजनाचे उपग्रह लो अर्थ ऑर्बिटमध्ये पोहोचवण्यासाठी तयार करण्यात आले आहे. या पहिल्या चाचणी उड्डाणाचे उद्दिष्ट ४५० किलोमीटर उंचीवरील आणि ६० अंशांचा कल असलेल्या कक्षेत पोहोचणे हे आहे.

## कोरोनाची पुन्हा चाहूल? महाराष्ट्रात ४८ रुग्णांची नोंद

तभा वृत्तसेवा

मुंबई : कोरोना महामारीच्या आठवणी अजून ताज्या असतानाच पुन्हा एकदा कोविड-१९च्या रुग्णसंख्येबाबत चिंता वाढवणारी माहिती समोर आली आहे. आंध्र प्रदेशानंतर आता महाराष्ट्रातही कोरोनाचे रुग्ण आढळल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, आरोग्य विभागाने यासंदर्भात महत्त्वाचा खुलासा करत नागरिकांना घाबरून न जाण्याचे आवाहन केले आहे.




आंध्र प्रदेशात २६ जून ते १६ जुलैदरम्यान कोविड-१९चे १२ रुग्ण आढळले होते. त्यापैकी चार जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर १ जुलै ते १६ जुलैदरम्यान आणखी ११ जणांना कोरोनाची लागण झाल्याची नोंद झाली.मृत्यू झालेल्या चारही रुग्णांना आधीपासून गंभीर सहव्याधी होत्या, अशी माहिती आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली आहे.

दरम्यान, महाराष्ट्रातही कोरोनाचे काही रुग्ण आढळल्याने नव्या लाटेची चर्चा सुरू झाली आहे. मात्र, राज्याच्या आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे की, सध्या आढळणारी बहुतांश प्रकरणे सौम्य स्वरूपाची असून राज्यात कोरोनाच्या नव्या लाटेची कोणतीही चिन्हे दिसून आलेली नाहीत. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि घाबरून जाण्याचे कारण नसल्याचेही विभागाने स्पष्ट केले आहे.राज्य आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, २०२६ या वर्षात आतापर्यंत महाराष्ट्रात कोरोनाचे एकूण ४८ रुग्ण आढळले आहेत. यामध्ये जानेवारीत ३, फेब्रुवारीत १, जूनमध्ये ११ आणि जुलैमध्ये आतापर्यंत २१ रुग्णांची नोंद झाली आहे.

दिलासादायक बाब म्हणजे या रुग्णांपैकी एकाचाही मृत्यू झालेला नाही. आरोग्य विभागाने नागरिकांना आवश्यक ती स्वच्छता, हात धुण्याची सवय आणि आजाराची लक्षणे आढळल्यास तातडीने वैद्यकीय सल्ला घेण्याचे आवाहन केले असून, सध्या घाबरण्याऐवजी सतर्क राहण्याची गरज असल्याचे सांगितले आहे.

## कृषी अधिकारी येणार बांधावर

मुंबई : शेतकऱ्यांकडून बोगस बियाणे किंवा खतांची तक्रार प्राप्त झाल्यानंतर पुढील सात दिवसांच्या आत कृषी अधिकारी प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन तपासणी करतील आणि आपला अहवाल अंतिम करतील, अशी घोषणा कृषी मंत्री दत्तात्रय भरणे (ऊ्रींरीरू इहरीपश) यांनी शनिवारी केली. यासाठी तालुकास्तरीय तक्रार निवारण समित्यांची फेररचना करण्यात आली असून तसा शासननिर्णय कृषी विभागाने निर्गमित केला आहे.

खरीप हंगामात बियाण्यांच्या उगवण क्षमतेसह खते आणि कीटकनाशकांच्या गुणवत्तेबाबत अनेक तक्रारी प्राप्त होत असतात. या तक्रारींचे तातडीने आणि प्रभावीपणे निराकरण व्हावे, यासाठी शासनाने तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीची सुधारित रचना लागू केली आहे. तालुका कृषी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या या समितीत कृषी विद्यापीठ, कृषी संशोधन केंद्र किंवा कृषी विज्ञान केंद्र आणि महाबीज यांचा प्रतिनिधी, तसेच संबंधित कृषी अधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे.

## 'एनडीए'त जाणार नाही - जयंत पाटील

तभा वृत्तसेवा

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचे विलीनीकरण होणार असल्याच्या आणि शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे महायुती सरकारमध्ये नवे अर्थमंत्री म्हणून शपथ घेणार असल्याच्या चर्चांनी राजकीय वर्तुळात चांगलाच जोर धरला होता. मात्र, या सर्व चर्चांना खुद्द जयंत पाटील यांनी पंढरपूर येथे पूर्णविराम दिला आहे. आम्ही राष्ट्रीय लोकशाही आघाडीत जाणार नाही आणि विलीनीकरणाबाबत आमची कोणाशीही कोणतीही चर्चा सुरू नसल्याचे स्पष्ट करत त्यांनी या बातम्या निव्वळ अफवा असल्याचे सांगितले.

आम्ही सर्व जण शरद पवार यांच्यासोबत पूर्ण निष्ठेने उभे असून कार्यकर्त्यांनी मनात कोणताही संभ्रम बाळगू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे.

जयंत पाटील आणि भाजपचे नेते विनोद तावडे यांची भेट, त्यापाठोपाठ ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील भेट आणि नुकतीच जयंत पाटील यांनी मुख्यमंत्र्यांची घेतलेली भेट, या वेगवान घडामोडींमुळे राजकीय तर्कवितर्कांना उधाण आले होते. जयंत पाटील यांच्या गळ्यात अर्थमंत्री पदाची माळ पडणार अशा बातम्याही माध्यमांमधून समोर येत होत्या. या पार्श्र्वभूमीवर शनिवारी पंढरपूर येथे शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात सुरू असलेल्या शेतकऱ्यांच्या अधिवेशनासाठी आले असता जयंत पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधला आणि रंगलेल्या चर्चा फेटाळून लावल्या.

आम्हाला एनडीएकडून कोणतेही निमंत्रण आलेले नाही आणि तिथे जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे सांगत पाटील यांनी माध्यमांना टोला लगावला की, आम्ही कुठलीही स्पर्धा करत नाही, कुठले खाते मागितलेले नाही आणि कोणतीही मागणी केलेली नाही, तरीसुद्धा गेल्या दोन-तीन दिवसांत माध्यमांनी मला दोन-तीनदा अर्थमंत्री पदाची शपथ दिल्यासारखेच दिसत आहे. या वेगवेगळ्या बातम्या पाहून आमची करमणूक होत असून त्यावर वारंवार काय प्रतिक्रिया देणार, असेही ते म्हणाले.



## मुंबईत चोरट्यांचा धुमाकूळ; तीन महिन्यांत ३,९४१ चोरी-घरफोड्या, दर ३३ मिनिटांनी एक गुन्हा

तभा वृत्तसेवा



मुंबई: मुंबई पोलिसांच्या एप्रिल, मे आणि जून २०२६ या तीन महिन्यांच्या मासिक गुन्हे अहवालातून मालमत्तेविरुद्धच्या गुन्ह्यांचे चिंताजनक चित्र समोर आले आहे. या कालावधीत शहरात चोरी आणि घरफोडीचे एकूण ३,९४१ गुन्हे नोंदविण्यात आले.म्हणजेच मुंबईत दररोज सरासरी ४३, तर प्रत्येक ३३ मिनिटांनी एक चोरी किंवा घरफोडी घडत असल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट होते. त्यामुळे मुंबईकरांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.मुंबईत मोठ्या प्रमाणात मोबाईल चोरी, दुचाकी-चारचाकी वाहनचोरी, घरफोडी, दुकाने फोडून चोरी आणि साखळी चोरीच्या घटना नोंदवल्या जात आहेत. रेल्वे स्थानके, बाजारपेठा, मॉल्स आणि दिवसभर कुलूपबंद असलेली घरे चोरट्यांच्या रडारवर असल्याचे तपासातून समोर येत आहे.मुंबई पोलिसांनी अनेक सराईत टोळ्यांचा पर्दाफाश करून चोरीचा मुद्देमाल जप्त केला असला, तरी गुन्ह्यांची संख्या अजूनही मोठी आहे.या काळात चोरीच्या १,०६४, तर घरफोडीच्या २१० गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे.आकडेवारीवरून चोरीच्या गुन्ह्यांचा शोध लागण्याचे प्रमाण केवळ २९ टक्के असल्याचे दिसून येते. त्याउलट घरफोडीच्या ६४ टक्के गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले.गेल्या तीन महिन्यांत शहरात काही गाजलेल्या चोरीच्या प्रकरणांनीही लक्ष वेधले. मागाठाणे पोलिसांनी एमटीएनएलच्या भूमिगत केबल चोरीचा पर्दाफाश करत सुमारे १.१० कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत केबल्स, जेसीबी आणि टेम्पो जप्त करण्यात आला.

## 'माथेरानची राणी' हायड्रोजनच्या बळावर धावण्याची शक्यता; ऐतिहासिक मिनी ट्रेनच्या नव्या प्रवासाची तयारी

तभा वृत्तसेवा

रायगड : सह्याद्रीच्या हिरव्यागार डोंगररांगांमधून वळणावळणाने धावणारी आणि पर्यटकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारी ' माथेरानची राणी ' आता आधुनिक तंत्रज्ञानाच्या दिशेने वाटचाल करण्याच्या तयारीत आहे. नेरळ-माथेरानदरम्यान धावणाऱ्या या ऐतिहासिक हिल रेल्वेला भविष्यात हायड्रोजन इंजिनाची ताकद मिळण्याची शक्यता असून, त्यामुळे माथेरानच्या रेल्वे इतिहासात हरित ऊर्जेचे नवे पर्व सुरू होण्याची शक्यता आहे.




रेल्वे मंत्रालयाच्या'हायड्रोजन फॉर हेरिटेज' या महत्त्वाकांक्षी उपक्रमात माथेरान हिल रेल्वेचा समावेश करण्यात आला आहे. देशातील ऐतिहासिक रेल्वेमार्गांचा वारसा जपत त्यांना प्रदूषणमुक्त तंत्रज्ञानाची जोड देण्याचा भारतीय रेल्वेचा हा प्रयत्न आहे. २०२३-२४ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात या उपक्रमाची घोषणा करण्यात आली होती. माथेरानसह कालका-शिमला, दार्जिलिंग हिमालयन रेल्वे, निलगिरी माउंटन रेल्वे, कांग्रा व्हॅली, बिलीमोरा-वाघई, पाताळपानी-कालाकुंड आणि मारवाड-गोरम घाट या हेरिटेज रेल्वेमार्गांचा या योजनेत समावेश आहे.प्रत्येकहायड्रोजन ट्रेनसाठीसुमारे ८० कोटी रुपये, तर हायड्रोजन निर्मिती व इंधन भरण्याच्या सुविधांसाठी सुमारे ७० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. हायड्रोजन आणि ऑक्सिजनच्या रासायनिक अभिक्रियेतून वीज निर्माण होत असल्याने या तंत्रज्ञानातून कार्बन उत्सर्जन मोठ्या प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे. नेरळ ते माथेरानदरम्यानसुमारे २१ किलोमीटरच्या अरुंदमापी मार्गावर धावणारी ही रेल्वे सध्या डिझेल इंजिनावर चालते. भविष्यात हायड्रोजन इंजिनाचा वापर झाल्यास पर्यावरण संवेदनशील माथेरानमध्ये धूर व प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे. दरम्यान, रेल्वेमंत्री अश्र्विनी वैष्णव यांनी यापूर्वी माथेरान हिल रेल्वेचे ऐतिहासिक स्वरूप कायम ठेवून तिला इलेक्ट्रिक किंवा हायड्रोजन तंत्रज्ञानावर चालविण्याची शक्यता व्यक्त केली होती. त्यामुळे ऐतिहासिक रूप कायम ठेवत 'माथेरानची राणी' आधुनिक आणि पर्यावरणपूरक ऊर्जेवर धावण्याचे स्वप्न आता प्रत्यक्षात येण्याची शक्यता आहे.मात्र हायड्रोजन इंजिन प्रत्यक्ष सेवेत कधी दाखल होणार, याबाबत अद्याप निश्र्चित वेळापत्रक जाहीर झालेले नाही. तरीही देशातील पहिल्या हायड्रोजन ट्रेनच्या यशानंतर माथेरान हिल रेल्वेकडे आता नव्या आशेने पाहिले जात आहे.




# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## एमआयडीसी उपकेंद्रातील कामामुळे आज काही भागांचा वीजपुरवठा बंद राहील

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ जुलै : महापारेषण कंपनीच्या १३२ केव्ही एमआयडीसी उपकेंद्र, लातूर येथे तातडीची दुरुस्ती व देखभाल तसेच ३३ केव्ही मेन बस सेक्शनवरील आवश्यक तांत्रिक कामे करण्यात येणार असल्यामुळे रविवार, दि. १९ जुलै २०२६ रोजी सकाळी ७.00 ते १0.३0 वाजेपर्यंत काही भागांचा वीजपुरवठा बंद राहणार असल्याची माहिती महावितरणने दिली आहे.

या कालावधीत ३३ केव्ही एमआयडीसी, ३३ केव्ही जीआयएस, ३३ केव्ही टीना आणि ३३ केव्ही आर्वी या फिडरवरील वीजपुरवठा बंद राहणार आहे. या दरम्यान ३३ केव्ही मेडिकल-आर्वी फिडरवरील बस साईड जंप बदलणे, टीएफ-२ एलव्ही सीटी ऑईल गळती तपासणी व कलरिंग, त्रैमासिक उपकेंद्र देखभाल तसेच बस आयसोलेटरची दुरुस्ती व देखभाल ही कामे करण्यात येणार आहेत. या कामामुळे खाडगाव रोडचा पश्र्चिम भाग, पोतदार स्कूल परिसर, दयानंद कॉलेज, बार्शी रोडवरील पाण्याची टाकी परिसर, एक नंबर चौक, चौधरी नगर, प्रकाश नगर, झी माउंट लिटरा, नावंदर सोसायटी, संगीत महाविद्यालय, शिवाजी चौक, साईबाबा मंदिर परिसर, स्वामी समर्थ मंदिर परिसर, पीव्हीआर टॉकीज परिसर, सोना नगर, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, जुनी एमआयडीसी, किर्ती गोल्ड, टीना मिल, कळंब रोड, अंबाजोगाई रोड, एसपी कार्यालय परिसर, खोरी गल्ली, कायामखानी पंप, श्याम नगर, विशाल नगर, जुना व नवीन रेणापूर नाका, आंबा हनुमान मंदिर परिसर, पापविनाश रोड, मयूरबन, अजिंक्य नगर, शारदा नगर, इंडिया नगर, दीपज्योत नगर, श्रीनगर, रेल्वे स्टेशन परिसर, भांबरी चौक, मेडिकल कॉलेज, आर्वी, साई रोड, काशीलिंगेश्र्वर, गंगासागर, डी-मार्ट व पद्मावती नगर या परिसरातील वीजपुरवठा बंद राहणार आहे.



## विविध वृत्त....

### शिक्षकांना SIR मधून मुक्त करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ जुलै : SIR मुळे शाळेची वेळ बदलली असली तरी SIR चं काम वेगाने पूर्ण होतयं का? हे बघावे लागेल . विशेष म्हणजे शिक्षणाधिकारी यांनी पहिला आदेश काढून शाळेची वेळ बदलली असून ती सकाळी७:३0 ते१२:३0 अशी केली आहे . दुसरा आदेश काढून जे शिक्षक बि.एल ओ . नाहीत, त्यांनी बी.एल ओ . ना मदत करावी . असे आदेशात नमूद केले आहे . पण यात अडचण दिसते की, जे शिक्षक बी.एल ओ नाहीत ते शाळा सुटली की लगेच घरी जातात . आणि जे बी एल ओ चे काम करत आहेत.

### धूर फवारणीची

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ जुलै : शहरातील लेबर कॉलनी परिसरात डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. पाऊस पडत नसल्याने गटारी तुंबल्या आहेत. रिमझिम पावसामुळे काही ठिकाणी पाण्याचे डबके साचले आहेत. या डबक्यांत डोसोत्पत्ती मोठ्या प्रमाणात होत आ-है. डासांसोबतच माशांचाही प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे लेबर कॉलनी परिसरात धुर फवारणी करावी, उघड्यावर पडलेला कचरा उचलावा आदी मागण्या नागरिकांनी केल्या.

### तुळजाभवानी कनिष्ठ महाविद्यालयाचे नीट परीक्षेत यश



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ जुलै : नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) च्यावतीने जून २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या नीट परीक्षेचा निकाल गुरुवारी रात्री जाहीर करण्यात आला असून या परीक्षेत येथील तुळजाभवानी कनिष्ठ महाविद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली आहे.

कुलदीप कैलासराव झोल हा विद्यार्थी ५५६ गुण मिळवत महाविद्यालयात प्रथम, प्रमोद ज्ञानोबा बावचे ४६४ द्वितीय तर कुलस्वामिनी कैलासराव झोल ही विद्यार्थिनी ३९७ गुण मिळवत महाविद्यालयात तृतीय आली आहे. यासोबतच अन्य विद्यार्थ्यांनीही या परीक्षेत यश संपादन केले आहे.

या यशाबद्दल संस्थेच्या सचिव के. ए. जायेभाये, राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, प्रा. व्ही. व्ही. लोहारे आदींनी या विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

# बारावीनंतरच पदवीसोबत यूपीएससी-एमपीएससीची तयारी

## ‘एमआयटी-एडीटी’चा अभिनव उपक्रम; प्रशासकीय अधिकारी होण्याचा मार्ग अधिक सुकर




तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ जुलै : केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी), बँकिंग, कर्मचारी निवड आयोग (एसएससी) तसेच अन्य स्पर्धा परीक्षांसाठी दरवर्षी लाखो विद्यार्थी प्रयत्न करतात. मात्र, पदवी पूर्ण झाल्यानंतर स्वतंत्रपणे स्पर्धा परीक्षांची तयारी करताना वेळ आणि आर्थिक खर्च मोठ्या प्रमाणात वाढतो. ही गरज लक्षात घेऊन एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी (एमआयटी-एडीटी) विद्यापीठाच्या एमआयटी स्कूल ऑफ इंडियन सिव्हिल सर्व्हिसेसने (एसआयसीएस) बारावीनंतरच पदवी शिक्षणासोबत यूपीएससी, एमपीएससी, बँकिंग आणि इतर स्पर्धा परीक्षांची एकात्मिक तयारी करून देणारा बी.ए. (ॲडमिनिस्ट्रेशन) हा अभिनव अभ्यासक्रम सुरू केला आहे, अशी माहिती स्कूलचे प्राध्यापक डॉ. अरूण तुपे यांनी दिली.

याप्रसंगी, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी प्रा.चंद्रकांत बोरुडे, लातूरच्या एमआयटी शैक्षणिक संकुलाचे जनसंपर्क अधिकारी श्रीधर घुले आदी उपस्थित होते.

डॉ. तुपे म्हणाले की, स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असलेले विषय पदवी शिक्षणासोबतच शिकता यावेत, यासाठी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली या अभ्यासक्रमाचा आराखडा यूपीएससी, एमपीएससी आणि बँकिंग स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासक्रमाशी सुसंगत ठेवण्यात आला आहे. त्यामुळे पदवी पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षांची भक्कम तयारी होण्यास मदत होते.

या अभ्यासक्रमात भारतीय राज्यघटना, सार्वजनिक प्रशासन, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, राज्यव्यवस्था, आंतरराष्ट्रीय संबंध व भू-राजकारण, सुशासन, सार्वजनिक धोरण, सार्वजनिक वित्त, भारतीय व जागतिक अर्थव्यवस्था, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सुरक्षा, परराष्ट्र धोरण, शाश्र्वत विकास, डिजिटल प्रशासन, कृत्रिम बुद्धिमत्ता व उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा प्रशासनावरील प्रभाव, पर्यावरणीय धोरणे, चालू घडामोडी, विश्र्लेषणात्मक विचार, तार्किक क्षमता, संवाद कौशल्य, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता, व्यक्तिमत्त्व विकास, उत्तरलेखन आणि मुलाखत कौशल्य यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रमासोबतच स्पर्धा परीक्षांची तयारी एकाच शैक्षणिक चौकटीत करता येणार असून, स्वतंत्र वेळ आणि अतिरिक्त खर्चाची गरज मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

स्पर्धा परीक्षांसोबतच विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेवरही या अभ्यासक्रमात भर देण्यात आला आहे. शासन, सार्वजनिक क्षेत्र, बँकिंग, प्रशासन, धोरण विश्र्लेषण तसेच विविध स्पर्धात्मक करिअर क्षेत्रांसाठी आवश्यक कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित करण्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

एमआयटी एसआयसीएसमध्ये विद्यार्थ्यांना तज्ज्ञ प्राध्यापकांचे (प्रोफेसर इन प्रॅक्टिस) मार्गदर्शन, नियमित टेस्ट सिरीज, उत्तरलेखनाचा सराव, मुलाखत प्रशिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास आणि करिअर मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. पदवी शिक्षणासोबतच स्पर्धा परीक्षांची नियोजनबद्ध तयारी केल्यास वेळ, खर्च आणि प्रयत्नांची बचत होऊन यशाची शक्यता अधिक वाढते. याच उद्देशाने एमआयटी-एडीटी विद्यापीठाने शिक्षण आणि स्पर्धा परीक्षा तयारीचा प्रभावी संगम घडवून आणणारा हा अभ्यासक्रम विकसित केला असल्याचे प्रा.चंद्रकांत बोरुडे यांनी सांगितले.

## लातूर जिल्ह्यातील ४१४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १८ जुलै : राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये लातूर जिल्ह्यातील मुदत संपलेल्या आणि आगामी काळात मुदत संपणाऱ्या एकूण ४१४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी संगणक प्रणालीद्वारे मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. राज्यातील बिगर व अंशतः अनुसूचित क्षेत्रातील सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या, तसेच सन २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नवनिर्मित ग्रामपंचायतींसाठी हा निवडणूक मतदार यादी कार्यक्रम राबविण्यात येत असल्याचे लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी कळविले आहे.

या निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करताना १५ एप्रिल २०२६ रोजी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभा मतदारसंघाची मतदार यादी वापरण्यात यावी, असे निर्देश निवडणूक आयोगाकडून प्राप्त झाले आहेत. या कार्यक्रमानुसार शुक्रवार, २४ जुलै २०२६ रोजी प्रभाग निहाय प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. या प्रारूप मतदार यादीवर नागरिकांना आपल्या हरकती व सूचना दाखल करण्यासाठी शुक्रवार, २४ जुलै २०२६ ते बुधवार, २९ जुलै २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. सर्व हरकती व सूचनांचा योग्य विचार करून मंगळवार, 0४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. नागरिकांनी व इच्छुकांनी विहित मुदतीत मतदार यादीची पडताळणी करून घ्यावी आणि आवश्यक असल्यास आपल्या हरकती नोंदवाव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

## महा राजस्व अभियानाच्या तयारीचा उपविभागीय अधिकाऱ्याकडून आढावा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ जुलै : छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियान शिबिर येथे घेतले जाणार आहे. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी दि. १४ जुलै रोजी आढावा बैठक घेतली. त्यात संबंधीत अधिकाऱ्यांना त्यांनी सूचना केल्या. शासनाने २२ जुलै, २५ जुलै व २६ जुलै या तीन दिवसांपैकी एका दिवशी हे शिबिर घ्यावे, असे आदेश दिले आहेत. येथे दि. २२ जुलै रोजी हे शिबिर होण्याची शक्यता आहे. त्यासंदर्भात बैठकीत आढावा घेतला. जनतेला एका छताखाली विविध योजनांचा लाभदेण्यासाठी हे शिबिर आहे.

## आ. अमित देशमुख यांनी घेतली डॉ. राठोड कुटुंबीयांची भेट



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ जुलै : येथील सुप्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. मेहुल राठोड यांचे नुकतेच अकस्मित निधन झाले आहे. माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दि. १७ जुलै रोजी शहरातील बार्शी रोड भागातील एम. जे. हॉस्पीटल या ठिकाणी असलेल्या डॉ. राठोड यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या आई श्रीमती मीनाताई राठोड, पत्नी डॉ. प्रियांका राठोड व राठोड परिवाराची भेट घेतली, त्यांचे सांत्वन केले, त्यांना धीर दिला.

यावेळी लातूर कृषि उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती ललितभाई शाह, ट्वेन्टी-वन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, विलास को-ऑपरेटीव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन ॲड. समद पटेल यांच्यासह राठोड कुटुंबीय उपस्थित होते.

## नीट परीक्षेत दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे यश



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ जुलै : वैद्यकीय प्रवेशासाठी राष्ट्रीय पातळीवर घेण्यात येणाऱ्या नीट परीक्षेत दयानंद विज्ञान महाविद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली आहे. वेदांत पाटील या विद्यार्थ्याने नीट परीक्षेत ५९५ गुण घेऊन महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला आहे. त्याचप्रमाणे शिवम तिवारी या विद्यार्थ्याने ५५५ गुण घेऊन महाविद्यालयातून द्वितीय क्रमांक मिळविला आहे व आयुष गावंड या विद्यार्थ्याने ५४८ गुण घेऊन महाविद्यालयातून तृतीय क्रमांक मिळविला आहे. ५00 पेक्षा अधिक गुण घेणारे १0 विद्यार्थी आहेत. प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांने जीवशास्त्र विषयातही उल्लेखनीय कामगिरी

करत सर्वोच्च ३६0 पैकी ३५६ गुण मिळवले असून, पाच विद्यार्थ्यांनी जीवशास्त्र विषयात ३५0 गुण मिळवले आहेत. महाविद्यालयातून ३९0 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती, त्यातील ३0४ विद्यार्थी वैद्यकीय प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत.

## राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाचे नीट परीक्षेत यश



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ जुलै : नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) च्यावतीने जून २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या नीट परीक्षेचा निकाल गुरुवारी रात्री जाहीर करण्यात आला असून या परीक्षेत राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाने यशाची घवघवीत परंपरा कायम राखली आहे. या परीक्षेत ९ विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश संपादन केले आहे.

कृष्णा रंगनाथ निरगुडे हा विद्यार्थी ७२0 पैकी ६११ गुण मिळवत महाविद्यालयात प्रथम, प्रथमेश कैलास नागरगोजे ५५५ द्वितीय, तर सोहम संजय लटपटे हा ५१५ गुण मिळवून तृतीय आला आहे. यासोबतच प्रतिक्षा प्रदीप तोरे हिने ४७६ गुण, प्रिया आदिनाथ राख ४५0, अनुराग अंकुश खरवतेकर ४३८, समरीन वाजिद शेख ४२४, अथर्व लक्ष्मण आडे ३७५, तर विश्र्वजीत विठ्ठल केंद्रे याने ३७0 गुण मिळवत यश संपादन केले आहे.

या यशाबद्दल शिक्षक आमदार विक्रम काळे, शिक्षण उपसंचालक दीपक चवने, शिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, डॉ. सी. आर. बावीसकर, के. ए. जायेभाये, प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्र्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, स्वाती केंद्रे, अश्र्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, प्रा. बी. बी. खटके, प्रा. ए. एस. खोत, प्रा. ए. व्ही. क्षीरसागर आदींनी या विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

## सुदानच्या उच्चस्तरीय कृषी शिष्टमंडळाची पाशा पटेल स्किलटेक विद्यापीठाला भेट

### बांबु शेती व बांबु उद्योग, कापूस संशोधन, बियाणे तंत्रज्ञान, ग्रीन हायड्रोजन व कौशल्य शिक्षणात सहकार्याची तयारी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ जुलै : सुदानमधील कसला प्रांताचे कृषिमंत्री डॉ. खिदिर रमादान सादिग मोहंमद यांच्या नेतृत्वाखालील उच्चस्तरीय कृषी व व्यापार शिष्टमंडळाने लोदगा (ता. जि. लातूर) येथील पाशा पटेल स्किलटेक विद्यापीठाला भेट देऊन कृषी शिक्षण, कौशल्य विकास आणि भारत-सुदान कृषी सहकार्याच्या विविध संधींवर चर्चा केली.

बैठकीत बांबु शेती व बांबु उद्योग,कापूस संशोधन, बियाणे तंत्रज्ञान, ड्रोन-आधारित शेती, प्रिसिजन ॲग्रिकल्चर, ग्रीन हायड्रोजन, हरित ऊर्जा, बांबू अर्थव्यवस्था, सौर उर्जा पवन ऊर्जा आणि कृषी निर्यात या क्षेत्रांमध्ये सामंजस्य करार करण्याबाबत चर्चा झाली. तसेच, सुमारे १00 सुदानी विद्यार्थ्यांना विद्यापीठात कृषी कौशल्य शिक्षण व प्रशिक्षण देण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला.

यावेळी कृषिमंत्री डॉ. खिदिर रमादान सादिग मोहंमद यांनी अफ्रीकी-एशियाई ग्रामीण विकास संगठन (--ठऊ्र) चे महासंचालक यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा करून या उपक्रमांसाठी --ठऊ्र च्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली. कृषी शिक्षण, क्षमता विकास, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये --ठऊ्र अंतर्गत येणार्या आशिया आणि आफ्रिकेतील सुमारे ३२ देशांतील विद्यार्थ्यांना लोदगा येथे शिक्षण, संशोधन आणि कौशल्य प्रशिक्षणासाठी सक्रिय सहकार्य करणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

गेल्या काही वर्षांतील अस्थिरतेनंतर सुदान आपल्या कृषी अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्याच्या प्रयत्नात असून, विशेषतः जगप्रसिद्ध कापूस उत्पादन पुन्हा उभे करण्यासाठी भारतासोबतचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. सुदान आणि महाराष्ट्रातील हवामान तसेच जमिनीच्या प्रकारातील साम्यामुळे हे सहकार्य अधिक प्रभावी आणि परिणामकारक ठरेल, असा विश्र्वास दोन्ही बाजूंनी व्यक्त करण्यात आली.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष तथा मुख्यमंत्र्यांच्या पर्यावरण व शाश्र्वत विकास कृती दलाचे कार्याध्यक्ष पाशा पटेल यांनी भारत-आफ्रिका कृषी सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी विद्यापीठ कटिबद्ध असल्याचे सांगितले. बैठकीस फिनिक्स फाउंडेशनचे समन्वयक डॉ. परवेज पाशा पटेल, राज्याचे चखढठ-संस्थेच्या बांबू विभागाचे प्रमुख तथा माजी महासंचालक श्री. नंदकुमार आणी विद्यापीठाचे पदाधिकारी तसेच दोन्ही देशांतील प्रतिनिधी उपस्थित होते.

## हरंगूळ - हडपसर रेल्वेगाडी कायमस्वरूपी करण्याची मागणी



तभा वृत्तसेवा

मुरुड दि. १८ जुलै : हरंगुळ हडपसर ही रेल्वे गाडी मागील दोन वर्षापासून रेल्वे विभागाने प्रायोगिक तत्त्वावर सुरू केली आहे. ती रेल्वे कायमस्वरुपी ठेवण्यात यावी, अशी मागणी रेल्वे संघर्ष समिती मुरुडच्यावतीने खासदार सुप्रिया सुळे यांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

सदरील रेल्वेस मोठ्या प्रमाणात प्रवाशांचा प्रतिसाद मिळत आहे. सदरील रेल्वे प्रायोगिक तत्वावर असल्याने तिकिटाचे दर ३0 टक्के अधिक आहे. या संदर्भात दि ६ जानेवारी २०२६ रोजी खासदार सुप्रिया सुळे यांना रेल्वे संघर्ष समिती, मुरुडच्या वतीने निवेदन देण्यात आले होते. निवेदनाच्या अनुषंगाने खासदार सुप्रिया सुळे यांनी सदरील निवेदन ट्विट केले होते. त्यानंतर रेल्वे बोर्डाने खासदार सुळे यांच्या ट्वीटची दखल घेऊन दि १७ मार्च २०२६ रोजी हरंगुळ हडपसर गाडी कायमस्वरूपी करावी असे परिपत्रक काढले.

सदरील परिपत्रक काढून ४ महिने झाले तरी मध्य रेल्वेने सदरील परिपत्रक लागू केलेले नाही. त्यामुळे हरंगुळ हडपसरसह मध्य रेल्वेच्या ८ रेल्वे गाड्या प्रायोगिक तत्त्वावर सुरू आहेत. हरंगुळ - हडपसर रेल्वे संदर्भात दि १७ मार्च २०२६ परिपत्रक तात्काळ लागू करावे. यासाठी खासदार सुप्रिया सुळे यांची यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई या ठिकाणी समितीच्या सदस्यानी भेट घेतली. यासंदर्भात संसदेच्या दि २0 जुलै २०२६ रोजी पासून सुरू होणाऱ्या पावसाळी अधिवेशनात सदरील विषय मांडू आणि हरंगुळ हडपसर सर्व ८ रेल्वे गाडी कायमस्वरूपी ठेवू असे आश्र्वासन सुप्रिया सुळे यांनी दिले.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### गंगाखेड येथे सोनम वांगचूक समर्थनार्थ एकदिवसीय सत्याग्रह आंदोलन

**परभणी,/प्रतिनिधी :** केंद्रीय शिक्षणंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचूक यांनी दिल्ली येथील जंतरमंतर मैदानावर सुरू केलेल्या उपोषणाच्या समर्थनार्थ गंगाखेड येथे शुक्रवारी (दि. १७) एकदिवशीय सत्याग्रह आंदोलन करण्यात आले.

यावेळी तहसीलदार यांच्यामार्फत राष्ट्रपतींना मागण्यांचे निवेदन पाठवण्यात आले. या निवेदनात, सोनम वांगचूक मागील १९ दिवसांपासून आमरण उपोषणास बसले आहेत. त्यांची तब्येत खालावली असून सरकार दखल घ्यायला तयार नाही, सोनम वांगचुक यांच्या नांवे २० पेक्षा जास्त संशोधन पेटंट असून त्यांना २०१८ रँमन मेगासेसे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या उपोषणाची दखल न घेणे ही बाब अत्यंत संतापजनक असल्याचे या निवेदनात म्हटले आहे. नीटसारख्या राष्ट्रीय परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणात शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेऊन दोषी सर्वांना कायदेशीर शिक्षा व्हावी, यासाठी सोनम वांगचूक यांच्या उपोषणाला यावेळी पाठिंबा जाहीर करण्यात आला. या एकदिवशीय सत्यागृह आंदोलनात कॉ. ओंकार पवार, सुरेश इखे, कॉ. योगेश फड, शंकर पवार, रामराव फड, बिबिषन मुरकुटे आदींसह नागरिकांनी सहभाग घेतला.

### एसआरआय अभियानाला युवा शक्तीची साथ; लोकशाहीचे दूत बनले शिवाजी महाविद्यालयाचे विद्यार्थी : मतदार यादी पुनरिक्षण मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**परभणी,/प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) अभियानाच्या जनजागृती व प्रसार कार्यक्रमाला परभणी येथील शिवाजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या वेळी विद्यार्थ्यांनी मतदार याद्यांच्या सखोल पुनरिक्षणाच्या कामात बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) यांना सक्रिय सहकार्य करण्याबरोबरच 'लोकशाहीचे दूत' म्हणून समाजात जनजागृती करण्याचा निर्धार व्यक्त केला.

जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या मोहिमेअंतर्गत आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मतदार यादी अद्ययावत ठेवण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार नितीन कांबळे यांनी मतदार यादी अचूक आणि विश्वासार्ह ठेवण्यामागील उद्देश स्पष्ट केला. मतदार याद्यांच्या सखोल पुनरिक्षणाचे नोडल अधिकारी प्रा. गणेश शिंदे, त्र्यंबक वडसकर आणि मोहन आल्हाट यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत एसआयआर प्रक्रियेचे महत्त्व, गणना फॉर्म भरण्याची पद्धत, आवश्यक कागदपत्रे तसेच ईसीआयनेट पच्या वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास प्रा. तुकाराम फिसफिसे, अरविंद शहाणे, प्रफुल शहाणे, रामप्रसाद अवचार आणि प्रा. शिवाजी कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. मदन परतूरकर, प्रा. डॉ. गणेश चालींद्रवार, प्रा. डॉ. नरेंद्र मुदिराज, प्रा. डॉ. आर. एल. देशमुख, प्रा. एल. ए. रासवे आणि डी. जी. वाघमारे यांनीही कार्यक्रमात सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी आपल्या परिसरातील नागरिकांमध्ये एसआयआर प्रक्रियेबाबत जनजागृती करण्याची तसेच मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि विश्वासार्ह करण्यासाठी सक्रिय भूमिका बजावण्याची ग्वाही दिली. युवकांचा वाढता सहभाग लोकशाही प्रक्रियेला अधिक बळकटी देणारा ठरणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### आरपीएफद्वारे दोन अल्पवयीन मुलांची सुटका; प्रवासी चोरी प्रकरणातील आरोपी जेरबंद

**परभणी,/प्रतिनिधी :** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील रेल्वे सुरक्षा दलाने (आरपीएफ) बाल संरक्षण आणि प्रवासी सुरक्षेच्या दिशेने उल्लेखनीय कामगिरी करत दोन स्वतंत्र कारवायांमध्ये घरातून पळून गेलेल्या दोन अल्पवयीन मुलांची सुरक्षित सुटका केली, तर प्रवासी चोरी प्रकरणातील एका आरोपीला अटक करण्यात यश मिळविले आहे.

'ऑपरेशन नन्हे फरिश्तेश अंतर्गत १५ जुलै रोजी जालना रेल्वे स्थानकावर संशयास्पदरीत्या फिरत असलेल्या दोन अल्पवयीन मुलांना आरपीएफच्या पथकाने ताब्यात घेतले. कर्तव्यावर असलेल्या रेल्वे सुरक्षा दलाच्या कर्मचाऱ्यांनी या मुलांची चौकशी केली असता त्यांनी आपली नावे प्रेम (वय १५) आणि प्रथमेश (वय १५) अशी सांगितली. दोघेही मुंबईतील विक्रोळी पूर्व येथील रहिवासी असून घरातून पळून आल्याची कबुली त्यांनी दिली. आरपीएफ निरीक्षकांनी तत्काळ संबंधित मुलांच्या पालकांशी संपर्क साधला. मुलांच्या वडिलांनी विक्रोळी पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार दाखल केल्याची माहिती दिली. त्यानंतर बाल संरक्षणाच्या नियमानुसार दोन्ही मुलांना पुढील काळजी आणि पुनर्वसनासाठी चाइल्ड हेल्पलाईन, जालना यांच्या ताब्यात सुपूर्द करण्यात आले.

दरम्यान, 'ऑपरेशन यात्री सुरक्षा' अंतर्गत रेल्वे सुरक्षा दलाच्या गुन्हे गुप्तवार्ता शाखा आणि शासकीय रेल्वे पोलीस, नांदेड यांच्या संयुक्त पथकाने प्रवासी चोरी प्रकरणातील एका आरोपीला अटक केली. हजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानकावर संशयास्पद हालचाली करत असताना किशनलाल (वय ४३, रा. पालम, जि. परभणी) याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान आरोपीने नोव्हेंबर २०२५ मध्ये जयपूर-काचेगुडा एक्सप्रेसच्या बी-२ डब्यातून एका महिला प्रवाशाची सोन्याचे दागिने व रोख रक्कम असलेली हँडबॅग चोरल्याची कबुली दिली. या प्रकरणी शासकीय रेल्वे पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५(सी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. यानंतर आरोपीला संबंधित गुन्ह्यात अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला पुढील तपासासाठी दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. चोरीस गेलेल्या मालाचा शोध घेण्याचे काम सुरू असल्याची माहिती रेल्वे पोलिसांनी दिली.

### परभणीत रिमझिम पावसाचे आगमन

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरात गेल्या दोन दिवसापासून ढगाळ वातावरण झाले असून यावेळी दमदार अशा पावसाचे आगमन होईल असे वाटत असतांना पावसाने मात्र शेतकऱ्यांना हिरमुसले. सध्या स्थितीत जिल्हयातील पिकांना एका मोठया पावसाचे गरज असतांना जिल्हयात दोन दिवसापासून रिमझिम असे पावसाचे आगमन झाले आहे. त्यामुळे शेतकरी यांच्या व्यतिरिक्त नागरिकांचे पावसाचे सुखद हस्य आले होते.

# अपंगाच्या मदतीसाठी तहसीलदार खुर्चीवरून उतरले

## मारुती कोत्तावर यांचे गाऱ्हाणे ऐकण्यासाठी तहसीलदार पांडुरंग माचेवाड थेट पायरीवर बसले

**मानवत,/प्रतिनिधी:-** शासकीय कार्यालयांमध्ये सामान्य नागरिकांना अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी अनेकदा तासन्तास प्रतीक्षा करावी लागते. मात्र मानवत तहसील कार्यालयात घडलेल्या एका प्रसंगाने प्रशासनातील संवेदनशीलतेचे आणि मानवतेचे दुर्मिळ दर्शन घडविले आहे. अपंग नागरिकाचे गाऱ्हाणे ऐकण्यासाठी तहसीलदार पांडुरंग माचेवाड यांनी स्वतःच्या पदाचा कोणताही बडेजाव न मिरवता खुर्चीवरून उठून थेट त्याच्याजवळ जाऊन संवाद साधला.

मानवत येथील मारुती कोत्तावर यांची अपंगत्वाशी संबंधित पेन्शन (पगार) काही कारणास्तव बंद झाली होती. ही समस्या घेऊन ते तहसील कार्यालयात आले होते. मात्र अपंगत्वामुळे त्यांना आपली व्यथा व्यवस्थितपणे मांडण्यात अडचणी येत होत्या. तहसीलदार पांडुरंग माचेवाड यांच्या दालनात पोहोचल्यानंतरही त्यांना उभे राहून अथवा समोरच्या खुर्चीवर बसून संवाद साधणे शक्य होत नव्हते.

ही बाब तहसीलदार माचेवाड यांच्या लक्षात येताच त्यांनी तत्काळ आपल्या खुर्चीवरून उठून संबंधित नागरिकाजवळ जाऊन त्याची विचारपूस केली. त्याचे म्हणणे समजून घेण्यासाठी त्यांनी थेट दालनातील पायरीवर बसून संवाद साधण्यास सुरुवात केली. अपंग नागरिकाचे म्हणणे सविस्तर असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी कोणतीही घाई न करता संयमाने त्याचे संपूर्ण गाऱ्हाणे ऐकून घेतले. विशेष म्हणजे, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी असूनही त्यांनी औपचारिकतेचा अडसर न ठेवता नागरिकाला आपुलकीची वागणूक दिली. संबंधित प्रकरणाची माहिती घेतल्यानंतर त्यांनी तात्काळ आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देत त्याचे काम मार्गी लावल्याची माहिती मिळाली. या घटनेचा व्हिडिओ आणि छायाचित्र समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर अनेक नागरिकांनी तहसीलदार माचेवाड यांच्या संवेदनशीलतेचे कौतुक केले आहे. ''अधिकारी पदावर बसून आदेश देणे सोपे असते; मात्र गरजू व्यक्तीच्या पातळीवर जाऊन त्याचे दुःख समजून घेणे ही खरी लोकसेवा आहे,'' अशा प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहेत. प्रशासन आणि सामान्य नागरिक यांच्यातील दरी कमी करण्यासाठी अशा संवेदनशील वर्तनाची गरज असल्याचे मतही व्यक्त होत आहे. मानवत तहसील कार्यालयात घडलेला हा प्रसंग केवळ एका अपंग नागरिकाचे काम मार्गी लावणारा नसून, प्रशासनातील माणुसकी अजूनही जिवंत असल्याचे दाखवून देणारा ठरला आहे. ''पदापेक्षा माणुसकी मोठी'' मारुती कोत्तावर यांचे गाऱ्हाणे ऐकण्यासाठी तहसीलदार पांडुरंग माचेवाड यांनी स्वतःच्या खुर्चीवरून उठून थेट पायरीवर बसून संवाद साधला. अपंग नागरिकाला स्वतःजवळ बोलावण्याऐवजी त्याच्याजवळ जाऊन त्याची समस्या समजून घेतली आणि ती सोडविण्याची कार्यवाही केली. या कृतीमुळे तहसील कार्यालयात उपस्थित नागरिकांनाही सुखद धक्का बसला आणि ''पदापेक्षा माणुसकी मोठी'' असल्याची प्रचिती आली. यावेळी तहसीलदार यांच्या या धोरणाचे स्वागत नागरिकांतून मोठया प्रमाणात होत आहे.



मानवत तहसिलदाराकडून मानवतेचे दर्शन..

## वाहतुक सुरक्षित व विना अपघात असावी- साळुंके



**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर आगारास परभणी विभाग नियंत्रक संदीप पडवळ यांच्या मार्गदर्शनात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेटी देत चालक,वाहक व यांत्रिक कर्मचाऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.वाहतूक अधिकारी सोळुंके यांनी असे सांगितले की चालकांनी आपले वाहन शांतपणे मार्गस्थ करावे,आपल्या कडून अपघाताचे प्रमाण होऊ नये या साठी योग्य काळजी घेऊन काळजीपूर्वक वाहन चालवावे व नियमांचे काटेकोर पालन करून अपघाताचे प्रमाण होणारच नाही अशी काळजी प्रत्येक एसटी चालकांनी घ्यावे असे आव्हान केले.

प्रत्येक चालकांनी व वाहकानी आपला गणवेश परिधान करावा. प्रवाशी वर्गासोबत वाहकांनी सामंजस्याने वागावे उगाच वाद घालून वेळ वाया घालू नये असा सल्ला दिला.तसेच मुख्यकारागीर व यांत्रिक कर्मचाऱ्यांनी चालकांसी सुसंवाद साधून सुरू असलेल्या पावसाळ्यात गाड्यांची व्यवस्थित कामे वेळेवर करून द्यावी असे आव्हान केले.

सुरक्षा दक्षता अधिकारी काळबांडे यांनीही चालकांनी आपल्या कर्तव्यावर असताना मद्यपान करू नये.सुरक्षा दक्षता पथका कडून या बाबत वेळोवेळी तपासण्या सुरू राहतील असे सांगुन प्रत्येक चालकांनी आपल्या वाहनात अग्निशमन यंत्र सुस्थितीत आहे किंवा नाही ही पाहणी करावी असे सांगून विविध मुद्दे विशद करून मोलाचे मार्गदर्शन काळबांडे यांनी केले.

आज भेटी दरम्यान पाहणी पथकात सुरक्षा दक्षता अधिकारी काळबांडे,विभागीय वाहतूक अधिकारी एस.पी.सोळुंके, लेखाधिकारी महेश थोरवे,आदींचा समावेश होता.या वेळी जिंतूर आगार वाहतूक निरीक्षक प्रमोद निर्मले,आगार लेखाकार ज्ञानेश्वर पांचाळ, मुख्य कारागीर सुनील पंडित,वाहन परीक्षक देवकर,लिपिक गजानना गीते,गजानन घुगे,गुणीरत्न वाकोडे चालक वाहक व यांत्रिक कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## जिल्हयाच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा गौरव कार्यक्रम संपन्न

**जिंतूर,/प्रतिनिधी-** ग्रामपंचायत विकास आराखडा २०२६-२७ संदर्भात आयोजित सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन राज्याच्या राज्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. यावेळी तालुक्यात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विविध क्षेत्रांतील गुणवंतांचा विशेष सन्मान करण्यात आला.



कार्यक्रमात काजळी रोहीणा येथील सरपंच अर्चना भारत इंदोरके, ग्रामपंचायत अधिकारी अभिजित पत्की, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सासवडे, विस्तार अधिकारी (आरोग्य) दिलीप लगड, एम. डी. तोडकर, खवणे पिंपरी येथील सरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते बापू चव्हाण, ग्रामपंचायत अधिकारी दत्ता पडघन, देवला पुनर्वसन येथील अंगणवाडी सेविका श्रद्धा रामेश्वर काळे, देऊळगाव गात येथील अंगणवाडी मदतनीस कविता तुकाराम कुम्हे, घरकुल ऑपरेटर ज्ञानेश्वर जाधव, ग्रामपंचायत कर्मचारी परमेश्वर कटारे, सरपंच शिवहरी शेवाळे, भागवत दळवे यांच्यासह काळेमामा यांचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी पंचायत समितीच्या सभापती विजयमाला डोंबे, उपसभापती सुलभाबाई घुगे, बाजार समितीचे सभापती डॉ. संजय रोडगे, जिल्हा परिषद सदस्या प्रीती डख, साक्षी साडेगावकर, पंचायत समिती सदस्य शिवराम कदम, प्रभाकर गजमल, अश्विनी पवार, सपना सावंत, द्रोपादिबाई मगर तसेच माजी जिल्हा परिषद सभापती अशोक काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटविकास अधिकारी उदय जाधव यांनी केले. यानंतर ग्रामपंचायत विकास आराखडा व पंचायत समिती विकास आराखडा २०२६-२७ या विषयावर मास्टर ट्रेनर गणेश तायडे यांनी तालुक्यातील सरपंच आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना सखोल मार्गदर्शन केले. ग्रामविकासासाठी प्रभावी नियोजन, स्थानिक गरजांवर आधारित विकास आराखडे तयार करणे आणि शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी याबाबत त्यांनी माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विस्तार अधिकारी मधुकर उमरीकर यांनी केले, तर आभार विस्तार अधिकारी प्रभाकर शिंदे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहाय्यक गटविकास अधिकारी संजय कळसाईत, अनिल टेकनूर, विठ्ठल कोरडे, आनंद इंगोले, एस. एस. देशपांडे, सचिन नरगर, सलीम चाऊस, कृष्णा अंभुरे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# व्हाईस ऑफ मीडियाच्या जिंतूर तालुका कार्यकारिणीची बिनविरोध

## तालुकाध्यक्षपदी सचिन रायपत्रीवार, सचिव दिलीप देवकर; जिल्हा संघटकपदी भागवत चव्हाण यांची निवड

**जिंतूर,/प्रतिनिधी-:** पत्रकारांच्या न्याय, हक्क आणि सन्मानासाठी कार्यरत असलेल्या व्हाईस ऑफ मीडियाच्या जिंतूर तालुका कार्यकारिणीची बिनविरोध निवड शुक्रवारी (दि. १७) सर्वानुमते करण्यात आली. संघटनेच्या बैठकीत नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यामध्ये तालुकाध्यक्षपदी सचिन रायपत्रीवार, तर सचिवपदी दिलीप देवकर यांची निवड करण्यात आली. तसेच माजी तालुकाध्यक्ष भागवत चव्हाण यांची जिल्हा संघटकपदी निवड झाल्याबद्दल उपस्थितांनी त्यांचा गौरव केला. ही बैठक व्हाईस ऑफ मीडियाचे राज्य कार्याध्यक्ष विजय चोरडिया यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.





अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष कैलास चव्हाण होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार राजाभाऊ नगरकर, जिल्हा उपाध्यक्ष मंचकराव देशमुख, साप्ताहिक विंगचे प्रदेश उपाध्यक्ष नेमिनाथ जैन, माजी तालुकाध्यक्ष भागवत चव्हाण, आनंदकुमार मुरक्या, रंगनाथ गडदे, प्रभाकर कुरे आदी मान्यवर उपस्थित होते. नवीन कार्यकारिणीत कार्याध्यक्षपदी मुंजा कंठाळे व किसानप्रसाद खाडे, उपाध्यक्षपदी संदीप माहूरकर, गणेश ठाकूर व श्रीपाद जोशी, सचिवपदी दिलीप देवकर, सहसचिवपदी तुकाराम सर्जे, संघटकपदी प्रशांत मुळी, सहसंघटकपदी पंकज चव्हाण, कोषाध्यक्षपदी रामकिशन ठोंबरे, सहकोषाध्यक्षपदी संतोष तायडे, प्रसिद्धीप्रमुखपदी राम रेघाटे यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणी सदस्य म्हणून आबासाहेब देशमुख, अतुल जगताप, राजू गारकर, शंतनु कुलकर्णी, अशोक उकंडे, शिवानंद कंठाळे, संतोष लहाने व पद्माकर कौसडीकर यांचीही बिनविरोध निवड करण्यात आली. बैठकीस गुलाबराव शिंदे, चंद्रकांत गवळी, एकनाथ अवचार, अशोकराव उकंडे, यादव मस्के, नितीन बंगाळे, रामा ढगरगे, दीपक राजूरकर, भास्करराव चौधरी यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करून संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांच्या हितासाठी अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचे आवाहन केले.

चार वर्षांच्या कार्याची दखल; भागवत चव्हाण यांच्यावर जिल्हा संघटकपदाची जबाबदारी व्हाईस ऑफ मीडियाचे माजी जिंतूर तालुकाध्यक्ष भागवत चव्हाण यांची जिल्हा संघटकपदी निवड करण्यात आली. राज्य कार्याध्यक्ष विजय चोरडिया यांच्या हस्ते त्यांना निवडपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष मंचकराव देशमुख यांनी चव्हाण यांनी गेल्या चार वर्षांत संघटनेच्या बळकटीसाठी केलेल्या कार्याचा गौरव करत त्यांच्या संघटन कौशल्याचे कौतुक केले. नव्या जबाबदारीतून जिल्हाभर संघटना अधिक सक्षम करण्यासाठी कार्य करावे, अशा शुभेच्छाही उपस्थित मान्यवरांनी दिल्या.

## अग्रलेख

# भारतीय रेल्वेत आता हायड्रोजन युग

देशातील पहिल्या हायड्रोजन रेल्वेचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुक्रवारी लोकार्पण झाले आणि भारतीय रेल्वेच्या इतिहासात एका नव्या युगाचा प्रारंभ झाला. इंधनाच्या क्षेत्रात एक नवी क्रांतीच झाली, असे म्हणावे लागेल. हरयाणातील जिंद रेल्वे स्थानकातून सोनिपतला रवाना झालेल्या या गाडीमुळे भारतीय रेल्वेच्या गौरवशाली इतिहासात एक नवे सोनेरी पान जोडले गेले. सुवर्णाक्षरांनी नोंद करावी, अशी ही घटना. हायड्रोजनवर धावणारी देशातील पहिली गाडी पर्यावरणानुकूल आणि स्वच्छ भारताचे प्रतीकही आहे.

हायड्रोजन गाडीमुळे चीन, फ्रान्स आणि जर्मनी या जगातील तीन विकसित देशांच्या यादीत भारताचा समावेश झाला आहे. सध्या या तीनच देशांत हायड्रोजनवरील गाड्या धावत आहेत. जे तंत्रज्ञान अजूनपर्यंत ब्रिटन आणि अमेरिका या देशांमध्ये वापरले गेलेले नाही, ते भारतात आले, ही तमाम भारतीयांच्या दृष्टीने आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. देशात एकेकाळी कोळशावर रेल्वेगाड्या धावत होत्या. काळा-काळा धूर हवेत सोडणाऱ्या या गाड्या प्रवाशांची गरज भागवत असल्या, तरी त्यांचा चेहरा आणि कपडे काळे करायलाही मागेपुढे पाहत नव्हत्या. पर्यावरणाचे जे नुकसान व्हायचे ते वेगळेच. लहान मुलांना मामाच्या गावाला जाण्यासाठी रेल्वे ही वाहतुकीचा स्वस्त आणि मस्त पर्याय होता. त्यातूनच 'झुकझुक झुकझुक अगीन गाडी, धुरांच्या रेषा हवेत सोडी, पळती झाडे पाहू या, मामाच्या गावाला जाऊ या' या त्या काळी गाजलेल्या लोकप्रिय गीताने अनेकांचे बालपण समृद्ध आणि आनंदी केले होते. त्यानंतर भारतीय रेल्वेत डिझेल इंजिनचे युग सुरू झाले. कालांतराने रेल्वे विद्युत इंजिनावर धावू लागली आणि आता हायड्रोजनवर भारतीय रेल्वे धावू लागली आहे. रेल्वेची ही प्रगती सर्वांनाच थक्क करणारी म्हणावी लागेल.

रेल्वे हे देशातील प्रवासाचे सर्वात स्वस्त, मस्त आणि आनंददायी साधन आहे. रेल्वेचा प्रवास हा नेहमीच सानथोरांसाठी आनंददायी राहिला आहे. भारतीयांची प्रवासासाठीची पहिली पसंती ही आजही रेल्वेच आहे. त्यामुळे वर्षभर सर्व रेल्वेगाड्या भरभरून धावत असतात. अनेक गाड्यांची प्रतीक्षा यादी तीन-चारशेपर्यंत जात असते. रेल्वेने प्रवास केला नसेल, असा माणूस शोधूनही सापडणार नाही. इंग्रजांनी रेल्वे भारतात आणली असली तरी नंतर भारतीयांनी या रेल्वेचे जे अत्याधुनिकीकरण केले, ते सर्वांची मान आनंदाने आणि अभिमानाने उंचावणारे असे आहे. २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील रालोआ सरकारने देशवासीयांना बुलेट ट्रेनचे नुसते स्वप्नच दाखवले नाही तर ते प्रत्यक्षात येण्याच्या जवळ पोहोचले आहे. १५ ऑगस्ट २०२७ ला बुलेट ट्रेनचा पहिला टप्पा सुरू होणार असल्याची घोषणा रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नुकतीच केली आहे.

आखाती युद्धामुळे जगात इंधनाचे कधी नव्हे ते गंभीर असे संकट उद्भवले आहे. जगभरात पेट्रोल आणि डिझेलची टंचाई निर्माण झाली, त्यांच्या किमती वाढल्या. भारताला पेट्रोल आणि इंधन आयात करावे लागते. त्यासाठी मोठ्या प्रमाणात परकीय चलन खर्ची पडते. पेट्रोलची आयात कमी व्हावी आणि परकीय चलनाची बचत व्हावी म्हणून पेट्रोलमध्ये टप्प्याटप्प्याने इथेनॉल मिसळण्याचा प्रयोग सुरू झाला; तो यशस्वीही झाला. इंधनाच्या क्षेत्रात देशाला आत्मनिर्भर करण्याचा विडा विकसित भारताचे स्वप्न पाहणाऱ्या पंतप्रधान मोदी यांनी उचलला आहे. त्यातून पर्यायी इंधनाचा शोध घेण्याची प्रक्रिया सुरू झाली. या शोधाची परिणती म्हणजेच सीएनजी आणि विजेवर चालणाऱ्या गाड्यांचे युग भारतात सुरू झाले. त्यात आता हायड्रोजन या इंधनाची भर पडली आहे. विजेवर धावणाऱ्या गाड्यांना ओव्हरहेड वायरमधून विजेचा पुरवठा केला जातो. हायड्रोजनवर धावणाऱ्या गाड्यांमध्ये हायड्रोजन आणि ऑक्सिजनची रासायनिक अभिक्रिया होऊन विद्युत निर्मिती होते. कोळशावर आणि डिझेलवर चालणारी इंजिने ज्याप्रमाणे स्वतःच ऊर्जा निर्मिती करीत असतात, त्याप्रमाणे हायड्रोजनवर चालणारी इंजिनेही ऊर्जा निर्मिती करणार आहे.

देशाला आज स्वच्छ आणि पर्यावरणानुकूल इंधनाची गरज आहे, जी हायड्रोजनमुळे पूर्ण होणार आहे. हायड्रोजनवर चालणाऱ्या चारचाकी गाड्या आधीच बाजारात आल्या आहेत. पर्यायी इंधनाचा आग्रही आणि सातत्याने पुरस्कार करणारे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी स्वतः या गाड्या वापरतात, हे साऱ्यांनाच ठाऊक आहे. पर्यायी इंधनाचा शोध घेणे ही काळाची गरज असली, तरी तशा गाड्या सर्वसामान्य माणसाच्या खिशाला परवडतील, अशा दरात उपलब्ध झाल्या पाहिजेत.

रेल्वेमंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यापासून भारतीय रेल्वेचा कायाकल्प करण्याचा संकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मार्गदर्शनात रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सोडला आहे. वैष्णव हे मूळचे सनदी अधिकारी असल्यामुळे त्यांना प्रशासन कसे चालते, याची पूर्ण जाणीव आहे. त्यामुळे भारतीय रेल्वेला फक्त गतिमानच नाही तर अत्याधुनिक करण्याचा विडा वैष्णव यांनी उचलला आहे. रेल्वेची गतिमानता, कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढविण्यासाठी आणि तिला अत्याधुनिक बनवण्यासाठी वर्षभरात ५२ महत्त्वाकांक्षी सुधारणा करण्याची घोषणा वैष्णव यांनी केली आहे. ते दोन टप्प्यांत मिळून आतापर्यंत १७ सुधारणा कार्यान्वितही झाल्या आहेत. 'वंदे भारत' आणि 'अमृत भारत' गाड्या धावू लागल्या आहेत. २०१४ च्या आधीच्या रेल्वे प्रवास आणि सध्याचा रेल्वे प्रवास यातील फरक समजण्यास पुरेसा जाणवू लागला आहे. गाड्या वेळेवर धावू लागल्या. स्वच्छता प्रवाशांना भावू लागली. रेल्वेस्थानकातील सुविधांत वाढ झाली. अनेक रेल्वेस्थानके तर विमानतळांनाही लाजवू लागली. सरकार दूरदृष्टीचा आणि विकासाचे महत्त्व समजणारे असले तर काय होऊ शकते, हे मोदींनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दाखवून दिले आहे. सरकारने देशातील रेल्वेचा चेहरामोहरा बदलून टाकला. जिंद ते सोनिपत हे ९० किमीचे अंतर कापणाऱ्या या हायड्रोजन गाडीला १० डबे राहणार असून यातील ८ प्रवासी डबे तर २ पॉवर कार आहेत. या गाडीत तयार करण्यात आलेल्या विशेष प्रकारच्या टाक्यांत हायड्रोजन वायू ( गॅस ) भरला जाईल. जिंद येथे हायड्रोजन गॅस तयार करण्याचा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. याठिकाणी विजेचे पाण्यासोबत इलेक्ट्रोलिसिस करून हायड्रोजन गॅस तयार केला जाईल. नंतर हायड्रोजन फ्युल सेल नामक उपकरणाच्या माध्यमातून ऑक्सिजनसोबत मिळवून वीज निर्मिती केली जाईल. वीज इंजिनाच्या मोटारपर्यंत पोहोचून ही गाडी धावणार आहे. यातून धूर म्हणून कार्बन डायऑक्साईड निघणार नाही. फक्त वाफ आणि उष्णता बाहेर पडेल, त्यामुळे सभोवतालच्या वातावरणात कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होणार नाही. डिझेलवर धावणाऱ्या गाड्यांच्या तुलनेत या गाडीतून शून्य उत्सर्जन होणार आहे. त्यामुळे तापमानात वाढ होणार नाही. हायड्रोजनवर धावणारी ही गाडी म्हणजे मानवी बुद्धी आणि विज्ञानाचा एकत्रित चमत्कारच म्हणावा लागेल. 'मोदी है तो मुमकिन है' असे उगीच म्हटले जात नाही. 'जे न देखे रवी ते देखे कवी' असे म्हटले जात होते; त्याच धर्तीवर 'जे न करे कोई, वो करे मोदी' असे म्हणायला हरकत नाही. येत्या काळात देशातील अनेक मार्गांवर हायड्रोजन गाड्या धावायला सुरुवात झाली तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. वंदे भारत गाड्यांनी देशातील लोकांचे मन जिंकले आहे. परिणामी वंदे भारत गाड्यांची मागणी आणि लोकप्रियता वाढली आहे. उद्या अशीच लोकप्रियता हायड्रोजनवर धावणाऱ्या गाड्यांनाही लाभणार आहे. तो दिवसही फार दूर नाही. रेल्वे क्षेत्रात देशाला हायड्रोजन युगात नेल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या समस्त सहकाऱ्यांचे अभिनंदन केले पाहिजे. ■

## स्मरण

# प्रेमळ मनाचा संघ समर्पित स्वयंसेवक

**सुधीर पाचपोर**

**आज १८ जुलै रोजी ज्येष्ठ स्वयंसेवक आणि मुस्लिम राष्ट्रीय मंचाचे राष्ट्रीय संयोजक कै. विराग पाचपोर यांचा प्रथम मासिक स्मृतिदिन. त्यानिमित्त त्यांच्या बंधूंनी दिलेली श्रद्धांजली...**

विराग श्रीकृष्ण पाचपोर हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक, नामवंत पत्रकार, लेखक आणि मुस्लिम राष्ट्रीय मंचाचे राष्ट्रीय संयोजक होते. ते माझे मोठे बंधू. वडिलांचे निधन झाल्यानंतर आम्हा भावंडांना त्यांची उणीव जाणवू न देणारा सर्वांचा आधार. तो अचानक आम्हाला परके करून निघून गेला. बाबांच्या तालमीत तयार झालेल्या विरागजींच्या आयुष्याची सुरुवात संस्कार आणि शिस्तीने परिपूर्ण अशी झाली. शाखेत जात असल्याने संघ संस्कारांनी युक्त असे विरागजी आयुष्यभर देशसेवेसाठी कार्यरत राहिले. त्यांनी राष्ट्रहित, सामाजिक समरसता आणि वैचारिक प्रबोधनासाठी मोठे योगदान दिले. वयाच्या ७४ व्या वर्षी, १८ जून २०२६ रोजी त्यांचे निधन झाले.

त्यांचा जन्म ६ एप्रिल १९५२ रोजी नागपूर येथे झाला होता. वडील सरकारी नोकरीत असल्याने सातत्याने बदली व्हायची. अनेक गावांमध्ये निवास करावा लागत असल्याने समाजातील वेगवेगळ्या लोकांशी संपर्क असायचा. त्यामुळे माणसे जोडण्याची कला लहानपणापासूनच त्यांच्यात होती. द्वितीय सरसंघचालक प. पू. गोळवलकर गुरुजींच्या सांगण्यावरून आमचे वडील यवतमाळला स्थायिक झाले. विरागजींचे शालेय शिक्षण यवतमाळच्या विवेकानंद शाळेत झाले. त्यानंतर त्यांनी वाणिज्य महाविद्यालयातून पदवी प्राप्त केली. यवतमाळला असताना अभाविपचे मंत्री म्हणून सामाजिक जीवनाची सुरुवात त्यांनी केली. काही वर्षे शिक्षकाची नोकरी केल्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते नागपूरला गेले आणि भूगोलात एम. ए. केले. पुढे संघाच्या सांगण्यावरून १९७५ साली पूर्वांचलात कामाला सुरुवात केली. विवेकानंद केंद्रातर्फे सेवाव्रती म्हणून अरुणाचल प्रदेशातील बोमडीला या चीनच्या सीमेला लागून असलेल्या गावात शिक्षकाची नोकरी करतानाच तेथे सामाजिक कार्याला सुरुवात केली. ते अरुणाचलला गेल्यानंतर लगेच आणिबाणी घोषित झाली. संघाच्या अनेक पदाधिकाऱ्यांना अटक झाली. माझे वडीलही तुरुंगात होते. मोठा भाऊ अरुणाचलात. जवळजवळ सहा महिन्यांनंतर विराग सुखरूप असल्याचा निरोप आला. अरुणाचलात अनेक समस्यांना तोंड देत, ख्रिश्चन मिशनरीजच्या कामाने व्यापलेल्या या भागात हिंदुत्वाचा भाव जागृत करणे हे अतिशय कठीण काम संघाने सुरू केले होते. कुठल्याही परिस्थितीत हा भाग भारतभूमीच्या मुख्य प्रवाहात आणायचा असा दृढ निश्चय करीत अनेक स्वयंसेवक संघकार्यासाठी पुढे आले. त्यात विराग होता याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. पुढे विद्याभारती या संघाच्याच स्वयंसेवकांनी सुरू केलेल्या संस्थेत आसाम प्रांताचा ऑर्गनायझिंग सेक्रेटरी म्हणून कामाची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे पार पाडली. प. पू. सुदर्शनजी त्यावेळी आसाम प्रांताचे प्रचारक होते. त्यावेळचे सरकार्यवाह शेषाद्रींच्या सांगण्यावरून विरागजींना



मा. सुदर्शनजींनी आसाम येथील दि सेन्टिनलया इंग्रजी दैनिकात सहसंपादक म्हणून काम करण्यास सांगितले. पुढच्या काळात मराठीवरही विशेष मेहनत घेतली. इंग्रजी लेखांच्या मराठी भाषांतराचे काम ते मागून घ्यायचे. मराठी पत्रकारितेत आपला दबदबा निर्माण करून ते पुन्हा इंग्रजी वृत्तपत्रांकडे वळले. 'हितवाद' या दैनिकात जवळजवळ २० वर्षे काम केले. २०१० मध्ये त्यांनी 'हितवाद'चा निरोप घेतला आणि पुढच्या १० वर्षांच्या काळात ते 'न्यूज भारती डॉट कॉम' या न्यूज पोर्टलचे संपादक म्हणून कार्य करू लागले. त्यांचे इंग्रजीसह मराठी, हिंदी, आसामी, बंगाली अशा अनेक भाषांवरही प्रभुत्व होते. चौकस बुद्धी, मान्यवरांशी असलेले सौहार्दपूर्ण संबंध आणि प्रत्येक विषयाच्या खोलाशी जाऊन त्याचे योग्य विवेचन करण्याची हातोटी यामुळे ते या क्षेत्रातही नावलौकिक करू शकले. अभ्यासाची व वाचनाची आवड विलक्षणच होती. त्या काळात आसाममध्ये बोडो आंदोलनाने अतिशय तीव्र स्वरूप धारण केले होते. विद्यार्थी नेते प्रफुल्ल मोहंती, अन्य विद्यार्थी नेते तसेच राजकीय नेते या आंदोलनात सक्रिय सहभागी होते. या आंदोलनाचा विरागजींचा विशेष अभ्यास होता. त्यावरील त्यांचे अनेक लेख तरुण भारतमध्ये छापून यायचे. आसामच्या वास्तव्यात अनेक ज्येष्ठ संघ प्रचारकांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. इस्लाम आणि ख्रिश्चन धर्म यांच्यावर त्यांचे सखोल चिंतन होते. विरागजींचे या विषयावरील 'दि इंडियन चर्च' हे अतिशय अभ्यासपूर्ण पुस्तक प्रसिद्ध आहे. 'राष्ट्रीय परिप्रेक्ष्य में भारतीय मुस्लिम' हे मुस्लिम राष्ट्रीय मंचाचे महम्मद अफजल यांच्याबरोबर लिहिलेले पुस्तक विषयाला कलाटणी देणारे ठरले. विशेष अभ्यासामुळे मुस्लिम तसेच ख्रिश्चन समाजाबरोबर काम करण्यासाठी विरागजींचे बरेच योगदान होते. संघाचे काम या समाजातील मान्यवरांना समजून सांगणे आणि संघाबद्दलचे त्यांचे गैरसमज दूर करणे असे दायित्व त्यांनी यशस्वीपणे निभावले. मुस्लिम राष्ट्रीय मंचाच्या राष्ट्रीय संयोजकपदाची जबाबदारी त्यांच्याकडे होती. अनेक वेळा जे मुस्लिम कार्यकर्ते मा. इंद्रेशजींच्या समोर म्हणणे मांडण्यास कचरत, ते विरागजींशी सहज बोलत. या कामात त्यांच्या पत्नी सुषमा वहिनींचा मोठा वाटा होता. त्याही मुस्लिम महिलांना या प्रवाहात जोडण्यासाठी काम करत. पुण्यात राष्ट्रीय विचाराचे 'एकता' हे मासिक निघते. प. पू. बाळासाहेब देवरस यांच्या जन्मशताब्दीनिमित्त विरागजींनी त्यात वर्षभर लेखमाला लिहिली. पुढे त्या लेखांचेही पुस्तक झाले. मा. इंद्रेशकुमारजींच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले. स्नेहल प्रकाशनने 'देवरस पर्व' हे पुस्तक प्रकाशित केले. या पुस्तकाला विदर्भ साहित्य संघाचा पुरस्कारही प्राप्त झाला. विवेकानंद सार्ध शतीनिमित्त 'विवेकानंद आणि क्रिश्चियानिटी' या विषयावर विरागजींनी इंग्रजी पुस्तक लिहिले. असे वेगवेगळ्या विषयांवर त्यांचे सतत लेखन सुरू होते.

ख्रिश्चन धर्मीयांशी चर्चा करून त्यांच्यातही राष्ट्रीय वृत्ती जागविण्याचा त्यांचा प्रयत्न असे. मा. सुदर्शनजी यांनी 'भारतीय ख्रिश्चन' ही संकल्पना मांडली होती आणि भारतीय चर्च असावेत, असा आग्रह धरला होता. ती कल्पना रुजवण्यासाठी विरागजी कार्यरत होते. ख्रिश्चन धर्मग्रंथांचा त्यांचा भरपूर अभ्यास असल्यामुळे त्या धर्मातील लोकांशी केलेल्या त्यांच्या चर्चा गाजत असत. नागपूरच्या 'इंटरनॅशनल सेंटर फॉर कल्चरल स्टडीज' या संस्थेचे विरागजी तीन वर्षे अध्यक्ष होते आणि २००९ साली त्यांच्या नेतृत्वात नागपूरला एक आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजनही या सेंटरने केले होते. विरागजींनी विपुल प्रमाणात लेखन केले. त्यांच्या या मूलभूत अध्ययनाला मानाचा मुजरा देण्यासाठीच सा. विवेकच्या वतीने त्यांना कै. राजाभाऊ नेने पुरस्कार नुकताच देण्यात आला.

१८ जूनला रात्री आपल्या कुटुंबाबरोबर त्यांनी भोजन केले आणि झोपायला गेले. सकाळी साडेपाचला उठणारे विरागजी का उठले नाहीत, हे बघायला सुषमा वहिनी गेल्या असताना त्यांना विरागजींचा मृतदेहच पाहावा लागला. त्यांचा मृत्यू धक्कादायक आणि चटका लावणाराही होता. शांत स्वभाव, अभ्यासू वृत्ती आणि दूरदर्शी विचार यामुळे ते संघ परिवार, पत्रकारिता आणि मुस्लिम राष्ट्रीय मंचाच्या कार्यकर्त्यांमध्ये लोकप्रिय होते. संघ परिवारातील मान्यवरांखेरीज मुस्लिम, ख्रिश्चन व बौद्ध बांधवही मोठ्या संख्येने त्यांच्या अंत्ययात्रेत उपस्थित होते. श्रद्धांजली सभेत इंद्रेशजी यांचे भाषण झाले. त्यांनी विरागजींचे शांतपणे ऐकून घेणे, अभ्यासून प्रकटणे या गुणांचा आवर्जून उल्लेख केला. सर्व जाती-धर्मांचा 'डीएनए' हा हिंदूंचाच आणि भारतीय आहे, ही बाब इंद्रेशजींनी अधोरेखित केली. त्या 'डीएनए'मुळेच छत्तीसगढ, गुजरात येथूनही मोठ्या संख्येत मुस्लिम बांधव विरागजींना अखेरचा निरोप द्यायला आले होते. माझा मोठा भाऊ असला, तरी तो अनेकांचा मार्गदर्शक व विचारवंत होता. त्यांचे विचार पुढील काळात अनेकांना मार्ग दाखवतील, यात शंकाच नाही. माझ्या भावाला आदरांजली. ■

पुणे। ९३७१००११७०

## वेध

**सोनाली पवन ठेंगडी**

# लग्न नको, मूल तर नकोच नको... !

पदवीधर असणारी निकिता म्हणते, मला लग्न करायचे नाही. आई-बाबा तुम्ही लग्न करून काय मिळवले? आईची वणवण, तुमचा संघर्ष हे सगळं काही मी पाहिलं आहे. मला असे आयुष्य जगायचे नाही. त्यामुळे मला लग्नाचा आग्रह करू नका. मला माझे स्वातंत्र्य गमवायचे नाही. अभियांत्रिकीचे शिक्षण घेतलेला तुषार म्हणतो, लग्न करून एकाच जोडीदारासोबत आयुष्य घालवणे, या आदर्शवादाच्या भानगडीत पडणे फारसे प्रॅक्टिकल नाही. लग्नामुळे कुठेतरी घर घ्या, नोकरीत कॉम्प्रमाईज करा, कुटुंबासाठी वेळ काढा इतक्या झंझटीत कोण पडणार? मी लग्न करणार नाही. एकटा राहील, जगभर भ्रमंती करेन. कोणाचे पाश नको.

निकिता आणि तुषार हे 'जेन झी' प्रतिनिधी आहेत. त्यांचे विचार ऐकून त्यांच्या आई-वडिलांची चिंता वाढली आहे की, ही मुलं आयुष्य एकट्याने कसे काढणार? पण, ही दोन केवळ उदाहरणे आहेत. प्रत्यक्षात आजच्या पिढीत लग्नाची, मुलांची जबाबदारी नको, ही मानसिकता मूळ धरताना दिसते आहे. त्यातही काही तरुण-तरुणी म्हणतात, लग्न नको...तर जे लग्नासाठी तयार होतात ते नंतर म्हणतात, मूल नको. ही मानसिकता कुठेतरी सामाजिक स्वास्थ्यासाठी फारशी पोषक नाही. जवळपास २० वर्षांपूर्वी जेव्हा कॉर्पोरेट क्षेत्रातील नोकऱ्यांचे चलन सुरू झाले तेव्हा 'डबल इन्कम नो किड्स' अर्थात 'डिंक' फॉर्म्यूला चर्चेत आला होता. दोघेही कमावतात, पण त्यांना अपत्य नको, या विचाराने अनेक जोडप्यांना अक्षरशः झपाटले होते. आताची तरुण पिढी तर त्याही पलीकडे जाऊन लग्न नको आणि मूल तर नकोच, अशा विचारांच्या वाटेवर चालण्याच्या तयारीत दिसते आहे.



मुळात, पालकांनी हे मुलांना समजावण्याची गरज आहे की, लग्न ही त्यांना वाटते तशी वैयक्तिक बाब नाही. हा सामाजिक विषय आहे. मानवाच्या नैसर्गिक गरजेला राजमार्गाने भागविण्याचा हा समाजमान्य शिरस्ता आहे. पण, म्हणून याचा उद्देश केवळ शारीरिक गरज भागवणे हा नाही तर याद्वारे नवीन प्रजा निर्माण करण्याचे म्हणजे एक नवीन पिढी जन्माला घालण्याचे कार्य होत असते. काही वर्षांपूर्वीपासूनच लग्न नको, मूल नको या विचारांनी गारूड घातल्याने आता अनेक देशांमध्ये लोकसंख्येची कमतरता जाणवते आहे. अनेक समाजांमध्ये नवीन पिढी निर्माण कशी होणार, ही चिंता भेडसावते आहे.

दक्षिण कोरियाचे एक ताजे उदाहरण वाचण्यात आले. तेथे नोकरीची व्यस्तता, कमी सामाजिक संवाद, एकटेपणा आणि डिजिटल जीवनशैलीने नातेसंबंध निर्माण करण्याच्या संधी कमी केल्या आहेत. विवाह कमी होत आहेत. अशा परिस्थितीत बौद्ध भिक्खू तरुणांना जोडीदार शोधण्यात मदत करीत आहेत. बौद्ध मंदिरे केवळ आध्यात्मिक केंद्र नाहीत, तर आता देशाचा घटता जन्मदर आणि तुटलेले सामाजिक संबंध जोडण्याचे नवीन माध्यम बनत आहेत. दक्षिण कोरियातील पालगोंगसान पर्वतावर वसलेल्या आठव्या शतकातील डोंगह्वासा मंदिरात नुकतेच ३० तासांचे डेटिंग रिट्रीट झाले. येथे बौद्ध भिक्खूंनी तरुणांना लग्न करून कुटुंब वसवण्याचे आणि संतती जन्माला घालण्याचे महत्त्व सांगितले. डेटिंग रिट्रीटचे आयोजक भिक्खू यू चोल-जू यांनी तरुणांना सांगितले, 'तुम्ही देशाला वाचवण्याच्या मोहिमेवर आहात. जोडीदार शोधा. लग्न करा आणि कुटुंब वाढवा.' पूर्वी भिक्खू देशाला बाह्य आक्रमणांपासून वाचवण्यासाठी पुढे येत असत. आज सर्वात मोठे संकट घटता जन्मदर आहे, त्यामुळे समाजाला मदत करणे हे आपले कर्तव्य आहे, या भावनेतून ते कार्य करत आहेत. ही कोरियाची बाब झाली, पण आपल्या देशात आंध्रप्रदेश सरकारने तिसरे अपत्य जन्माला घाला, असे सांगण्याची वेळ आली आहे. सुजाण, सुशिक्षित युवावर्ग जेव्हा एखाद्या सामाजिक शृंखलेला तोडू पाहतात तेव्हा तो विषय चिंतेचा ठरतो. कारण चांगल्या समाजाच्या निर्मितीसाठी लग्न, अपत्य ही सर्व सामाजिक कर्तव्ये नितांत गरजेची आहेत. त्यावर नवीन पिढी म्हणते की, आजच्या महागाईच्या काळात अपत्यांचे शिक्षण, संगोपन कठीण झाले आहे. तेही मान्य केले तरीसुद्धा समाजनिर्मितीचा विषय कमी महत्त्वाचा ठरत नाही. मूल कसे वाढवायचे, हा विषय शेवटी प्रत्येक जण आपल्या कुवतीनुसार ठरवत असतो. आपण चांगले संगोपन आणि शिक्षण याची जी व्याख्या केली आहे त्यात बदल करण्याची गरज आहे. खूप महागड्या शाळेत घातल्याने मुलांचा विकास चांगला होतो, त्यांना महागडे कपडे, खेळणे दिले तर आपण चांगले पालक होतो, असे मुळीच नाही. चांगले संगोपन म्हणजे चांगले संस्कार. अर्थात, नव्या काळातील हा विषय फार मोठा आणि व्यापक आहे. प्रत्यक्षात बदलत्या काळात परंपरा आणि आधुनिक विचार यांच्यात समतोल साधणे, हीच काळाची खरी गरज आहे. ■

९४०३२११६७३

## मुंबई वार्तापत्र

# मुंबईचे मालेगाव होणार ?

**नागेश दाचेवार**

महाराष्ट्राच्या राजकारणात आणि समाजकारणात 'मालेगाव मॉडेल' हे एका विशिष्ट जनसांख्यिकीय बदलासाठी आणि तिथल्या बदललेल्या राजकीय समीकरणांसाठी ओळखले जाते. मुंबईत सध्या सुरू असलेला संशयास्पद जन्म दाखल्यांचा खेळ, अनधिकृत शाळांचा सुळसुळाट आणि एकाच पत्त्यावर शेकडो-हजारो मतदारांची झालेली नोंदणी पाहता, आता मुंबईचे मालेगाव होणार का? असा अत्यंत रास्त आणि तितकाच भीतिदायक प्रश्न उपस्थित केला जात आहे. जर कागदपत्रांची ही बोगसगिरी अशीच सुरू राहिली आणि मुंबईसारख्या देशाच्या आर्थिक राजधानीत परदेशी घुसखोरांनी किंवा अपात्र घटकांनी मतदार यादीत पद्धतशीरपणे ताबा मिळवला, तर भविष्यात मुंबईची राजकीय आणि सामाजिक परिस्थिती मालेगावसारखी व्हायला वेळ लागणार नाही. हा केवळ एका शहरापुरता मर्यादित असलेला प्रश्न नसून मुंबईच्या मूळ भौगोलिक आणि सांस्कृतिक रचनेलाच सुरुंग लावणारे हे एक भयानक कारस्थान आहे, ज्याचा वेळीच बीमोड करणे गरजेचे आहे.

गेल्या काही महिन्यांपासून भारतीय जनता पक्षाचे धडाडीचे नेते किरीट सोमय्या यांनी 'व्होट जिहाद', 'स्कूल जिहाद', 'बनावट जन्म प्रमाणपत्र रॅकेट' आणि 'परदेशी घुसखोरांचे मतदार यादीतील पद्धतशीर घुसपेठ' यांसारख्या अत्यंत संवेदनशील आणि स्फोटक मुद्द्यांवर रणशिंग फुंकले होते. जेव्हा सोमय्या यांनी हे आरोप केले, तेव्हा विरोधकांनी नेहमीप्रमाणे 'निवडणुकीपुरता स्टंट', 'ध्रुवीकरणाचा प्रयत्न' किंवा 'राजकीय रंग' देऊन हे मुद्दे फेटाळण्याचा आटोकाट प्रयत्न केला गेला. मात्र, आता केंद्रीय निवडणूक आयोगाच्या 'विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेमुळे' (एसआयआर) सोमय्यांनी उपस्थित केलेले हे अत्यंत गंभीर प्रश्न थेट प्रत्यक्ष प्रशासकीय पडताळणीच्या टप्प्यावर आले आहेत. ही केवळ मतदार यादी सुधारण्याची मोहीम राहिलेली नसून ती मुंबई आणि महाराष्ट्राच्या भविष्यातील राजकीय भूकंपाची नांदी ठरणार आहे, हे आता स्पष्ट झाले आहे. किरीट सोमय्या यांनी नुकताच मुंबई महानगर पालिकेच्या कारभारावर आणि त्या माध्यमातून झालेल्या कथित मतदार नोंदणीवर जो धक्कादायक दावा केला आहे, त्याने प्रशासकीय वर्तुळात भूकंप घडवला आहे. सोमय्या यांच्या पुराव्यानुसार, मुंबई महापालिकेच्या हद्दीत तब्बल ८७ हजार ३४७ संशयास्पद जन्म प्रमाणपत्रांच्या आधारे मुंबईच्या विविध विधानसभा मतदारसंघांमध्ये हजारो मतदारांची बोगस नोंदणी झाली असण्याची दाट शक्यता आहे.

हा आकडा थक्क करणारा आणि लोकशाहीची थट्टा उडवणारा आहे. कोणतीही वैध कागदपत्रे नसताना केवळ विशिष्ट भागातील लोकसंख्या वाढवण्यासाठी आणि एका विशिष्ट विचारसरणीच्या पक्षांना विजयी करण्यासाठी ही बोगस जन्म प्रमाणपत्रे रात्रीतून छापली गेली का? हा सर्वात मोठा संशय आहे. या प्रकरणाचे गांभीर्य इतके प्रचंड आहे की, यामध्ये केवळ प्रशासकीय चौकशी पुरेशी ठरलेली नाही. या रॅकेटच्या मुळाशी जाण्यासाठी आता पोलिस तपास आणि विशेष चौकशी पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. प्राथमिक तपासाअंती काही बोगस अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात आली असून संशयास्पद ठरलेल्या शेकडो जन्मनोंदी तातडीने रद्द करण्याची कायदेशीर प्रक्रिया आता वेगाने सुरू झाली आहे. बोगस कागदपत्रांच्या आधारे जर परदेशी घुसखोरांना किंवा बोगस नागरिकांना मतदानाचा अधिकार मिळत असेल, तर ती देशाच्या सुरक्षिततेशी अक्षम्य तडजोड म्हणावी लागेल.

आता हा विषय जन्म प्रमाणपत्रांपुरता मर्यादित राहिला नसून मुंबई महापालिकेच्या हद्दीत सुरू असलेल्या शाळांपर्यंत येऊन ठेपला आहे. त्याला काय ते 'स्कूल जिहाद' वगैरे म्हणतात. सोमय्या यांनी मुंबई मनपाने स्वतः अधिकृतपणे जाहीर केलेल्या १६४ अनधिकृत शाळांचा दाखला देत त्यांनी यामागील एक मोठे आंतरराष्ट्रीय आणि सामाजिक षडयंत्र उघड केले. या शाळा कोणत्याही शासकीय नियमांचे पालन करत नाहीत, त्यांना कोणतीही अधिकृत मान्यता नाही. मग या शाळा सुरू कशा राहतात? या शाळांमधून नेमकं कोणतं शिक्षण दिलं जातं आणि त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे, या शाळांमधून मिळणारे बोगस शाळा सोडल्याचे दाखले आणि त्यांच्या आधारे तयार होणारे रहिवासी पुरावे... या सर्वांचा वापर करून मतदार यादीत बोगस नाव घुसवण्याची एक सुनियोजित 'साखळी' मुंबईत कार्यरत असल्याचे उघड झाले आहे. या बोगस शाळांच्या आडून नेमके कोणते हितसंबंध जपले जात आहेत, हे आता निवडणूक आयोगाच्या रडारवर आले आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार आता बूथ लेव्हल अधिकारी थेट नागरिकांच्या घराघरांमध्ये जाऊन मतदार यादीतील नावांची प्रत्यक्ष पडताळणी करीत आहेत. आयोगाची भूमिका अत्यंत स्पष्ट, पारदर्शक आणि लोकशाहीला बळकट करणारी आहे. आयोगाने जाहीर केले आहे की, कोणत्याही वैध आणि पात्र भारतीय नागरिकाचे नाव मतदार यादीतून कमी करणे हा या मोहिमेचा हेतू नाही. तर मृत व्यक्ती, स्थलांतरित झालेले नागरिक, एकापेक्षा अधिक ठिकाणी नावे असलेले किंवा पूर्णपणे अपात्र असणाऱ्या बोगस मतदारांची नावे शोधून मतदार यादी शुद्ध करणे हाच एकमेव उद्देश आहे. परंतु, या अत्यंत कायदेशीर आणि लोकशाही मार्ग बळकट करणाऱ्या प्रक्रियेला विरोधकांकडून ज्या प्रकारे कडाडून विरोध केला जात आहे, तो अत्यंत संशयास्पद आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आरडाओरड सुरू केली आहे की, ही मोहीम अत्यंत घाईघाईने आणि सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली राबविली जात आहे. नागरिकांना कागदपत्रे सादर करण्यासाठी पुरेसा वेळ दिला जात नसून यामुळे गरीब, स्थलांतरित मजूर आणि अल्पसंख्यक समाजातील नागरिक मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहतील, असा पद्धतशीर कांगावा विरोधक करीत आहेत.

मतदार यादी पूर्णपणे पारदर्शक आणि शुद्ध असावी, यात कोणतीही बोगस नावे नसावीत यावर सर्वांचे एकमत आहे, तर मग निवडणूक आयोगाचे कर्मचारी थेट घरापर्यंत येऊन पडताळणी करत असताना त्याला विरोध करण्याचे किंवा त्यात खोडा घालण्याचे कारण काय? बोगस मतदारांची नावे कट होणार आणि आपले बांगलादेशी बोगस मतदार कमी होणार, म्हणूनच तर हा पोटशूळ नाही ना? ■

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### माटे चौक ते प्रतापनगर चौक अतिक्रमणाने फूटपाथ गायब

गेल्या एक महिन्यांपासून फूटपाथवरचे अतिक्रमण काढणे मनपाने गाजावाजा करीत सुरू केले आहे. त्याचा त्या भागातील फूटपाथवर चालणाऱ्या लोकांना काय फायदा झाला हे त्यांनाच माहीत. याबाबतीत धरमपेठ झोन व लकडगंज झोन अग्रेसर आहेत असे वाटते. पण लक्ष्मीनगर झोन अतिक्रमण विरुद्ध काहीच कारवाई करताना दिसत नाही आहेत. कारण माटे चौक ते प्रतापनगर चौकापर्यंत फूटपाथच दिसत नाही. राम भंडार, उत्तर दक्षिण रेस्टॉरंट, वऱ्हाडी व्यंजन या रेस्टॉरंटसमोरील फूटपाथच दिसत नाहीत. त्यात फळवाले व फूड व्हॅनने फूटपाथ व्यापून टाकला आहे.

**राजेंद्र वाडी**/नागपूर

### एसटी भाडेवाढीपेक्षा सेवेत वाढ करा

वेगवेगळी कारणे देऊन राज्य एसटी महामंडळाने प्रवासी तिकिटामध्ये वाढ केल्याने प्रवाशांच्या खिशाला भुर्दंड बसणार आहे. १० टक्के हंगामी भाडेवाढ आता ३१ जुलैपर्यंत वाढविली आहे. प्रवाशांना सुखकर प्रवास देणे, आरामशीर,



वक्तशीरपणे प्रवास घडवणे हे एसटी महामंडळाचे कर्तव्य आहे. मात्र त्यालाच प्रवासी पारखा होतानाचे चित्र अनेक प्रवासादरम्यान दिसून येत आहे. प्रवाशांशी सौजन्याने, नम्रतेने वागणे, सुरक्षितता, शिस्त पाळणे, ठरलेल्या मार्गावर आणि वेळेवर बस चालवणे आदी कर्तव्य असताना एसटीतील अधिकारी, चालक, वाहक या कर्तव्यापासून दूर जाताना आढळून येत आहेत. काही उदाहरणे घ्यावयाची झाल्यास बऱ्याच वेळा एसटी प्रवासादरम्यान सुट्ट्या पैशावरून वाद होतात. त्यात वाहक प्रवाशांबरोबर उद्धटपणे बोलतात .विनंती थांब्यावर बस न थांबवणे, गर्दीचे कारण देऊन बसमध्ये येण्यास प्रवाशांना अटकाव करणे, अधिकृत बस थांबा असताना थांबा नसल्याबाबत दरडावून सांगणे, हे प्रसंग नित्याचेच बनले आहेत.

पुणे-कोल्हापूर प्रवासादरम्यान सातारा, कराड या मुख्य बसस्थानकात बस न नेता महामार्गावरूनच पुढे नेत असल्याने वाद होतात. साताराकडून स्वारगेटकडे आल्यावर अनेक प्रवाशांना मेट्रो स्थानकासमोर उतरावयाचे असते; जेणेकरून मेट्रो स्थानक आणि शहर बस स्थानकातून इच्छित स्थळी जाणे सोपे होते. मात्र, सुरक्षेचे कारण देऊन चालक स्वारगेट स्थानकात बस नेतो. प्रवाशांना पुन्हा मेट्रो आणि बस स्थानकात चालत प्रवासी बॅगा घेऊन येताना त्रास सहन करावा लागतो. या दरम्यानचे वाद नियमित होतात. भाडेवाढ केली तशी महामंडळाने 'प्रवाशांच्या सेवेसाठी' ब्रीदवाक्याप्रमाणे सेवेत वाढ केल्यास एसटीला सुगीचे दिवस येतील.

**नितीन कुंभार**/पिंपरी, पुणे.

### ओळखपत्र एकच असावे

जन्म झाल्यापासून ओळखपत्र लागू होते, जन्म प्रमाणपत्र, शाळा, कॉलेजचे वेगळे, नोकरीत वेगळे, आर्थिक व सरकारी विविध योजनाकरिता वेगवेगळे ओळखपत्र असतात. एक माणूस व एकच ओळखपत्र सर्व कामाकरिता असावे. सर्व कागदपत्र देऊनही अनेक ओळखपत्रांमध्ये अनेक चुका कशा होतात? चुका होऊ नये याकरिता लक्ष द्यावे. कारण चुका दुरुस्तीसाठी पुन्हा फॉर्म भरणे, कागदपत्र देणे व फी भरणे हा आर्थिक खर्च करावा लागतो. तेव्हा सर्व कामाकरिता एकच ओळखपत्र असावे हीच अपेक्षा.

**मुकुंद काकीरवार**/नागपूर, ८८०६९९२७७८

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी आएमए आक्रमक ; 20 जुलैला महाराष्ट्रात 24 तासांसाठी आरोग्यसेवा ठप्प

## इमर्जन्सी आपत्कालीन सेवा मात्र सुरु राहणार : डॉ.राजेश इंगोले

**अंबाजोगाई :** डोंबिवलीतील शास्त्रीनगर रूग्णालयात डॉक्टर आणि नर्सवर झालेल्या अमानुष हल्ल्याच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशनने राज्यव्यापी आंदोलन पुकारले आहे. आयएमए महाराष्ट्र शाखेने येत्या सोमवार, दिनांक २० जुलै सकाळी ६ ते मंगळवार २१ जुलै सकाळी ६ पर्यंत २४ तास सर्व नियमित आरोग्यसेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

या काळात सर्व ओपीडी बाह्यरूग्ण विभाग, नियोजित शस्त्रक्रिया आणि रूटीन तपासणी बंद राहील. मात्र गंभीर रूग्णांच्या जीवाशी धोका होऊ नये म्हणून आय.सी.यु, आपत्कालीन विभाग, प्रसूती कक्ष आणि जीवनावश्यक उपचार सुरू ठेवण्यात येणार आहेत. या आंदोलनात अलोपॅथी, आयुर्वेद, होमिओपॅथी, डेंटल, यूनाणीसह सर्व वैद्यकीय शाखांचे डॉक्टर, परिचारिका, पॅरामेडिकल स्टाफ आणि आरोग्य संघटना एकत्र येणार आहेत. महाराष्ट्र राज्य आयएमएने खालील प्रमुख मागण्या केलेल्या आहेत. त्या अशा - १) डोंबिवली हल्ल्यातील आरोपींना तात्काळ अटक आणि कठोर शिक्षा, २) डॉक्टर्स प्रोटेक्शन कायद्यात कडक तरतुदी आणि जलद अंमलबजावणी, ३) सर्व सरकारी आणि खाजगी रूग्णालयांमध्ये २५ ×७ सुरक्षा, सीसीटीव्ही प्रवेश नियंत्रण, ४) हल्ल्याच्या केसेससाठी फास्टट्रॅक कोर्ट, ५) आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र केंद्रीय कायदा आयएमए ने सरकारला इशारा दिला आहे की, ९ ऑगस्ट २०२६ पर्यंत ठोस निर्णय न झाल्यास राज्यभर बेमुदत संप आणि संपूर्ण वैद्यकीय सेवा बंद आंदोलन छेडण्यात येईल. जगातला कोणताही वैद्यकीय व्यावसायिक सर्वप्रथम रूग्णहिताला प्राधान्य देतो आपल्याकडे येणाऱ्या रूग्णाचे प्राण कसे वाचतील याकरिता तो आपले सर्व कौशल्य पणाला लावून त्या रुग्णाचा जीव वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न करत असतो. परंतु, ही सेवा देत असताना जर त्याच्या स्वतःच्याच जीविताला धोका असेल आणि अशा भयावह दडपणाच्या वातावरणात तो रुग्णाचा इलाज चांगल्या पद्धतीने करू शकेल का हा सवाल इंडियन मेडिकल असोसिएशनचे सांस्कृतिक विभागाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी सरकारला केला आहे. हा संपाचा निर्णय रूग्णांविरोधी नाही. डॉक्टर सुरक्षित राहतील तरच रुग्णसेवा सुरक्षित राहील असे डॉ.राजेश इंगोले यांनी स्पष्ट केले आहे. डोंबिवलीतील डॉक्टरांवरील हल्ल्याचा निषेध करण्यासाठी आयएमए ने २० जुलै रोजी सकाळी ६ ते २१ जुलै सकाळी ६ पर्यंत महाराष्ट्रातील सर्व नियमित आरोग्यसेवा बंद ठेवण्याची घोषणा केली आहे. फक्त इमर्जन्सी, अतिदक्षता विभाग आणि प्रसूती सेवा सुरू राहणार असल्याची माहिती इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्या अधिनिस्त सर्व शाखांना दिली आहे. या संपामुळे रूग्णांना होणाऱ्या त्रासाबद्दल इंडियन मेडिकल असोसिएशन दिलगीर आहे. परंतु, डॉक्टरांना काम करण्यासाठी मुक्त वातावरण मिळत नसल्याने तसेच छोट्या-मोठ्या गोष्टींवरून डॉक्टरांना, नर्सेसला, पॅरामेडिकल स्टाफला मारहाण होणे चुकीचे व गंभीर आहे त्यामुळे नाईलाजाने हा संप आम्हाला करावा लागत आहे असेही डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले. या लाक्षणिक एक दिवसीय संपानंतरही जर सरकारने ९ ऑगस्टपर्यंत सकारात्मक निर्णय न घेतल्यास संपूर्ण महाराष्ट्रात बेमुदत संप पुकारला जाईल आणी सर्व खासगी तसेच सरकारी वैद्यकीय सेवा संप काळात बंद केल्या जातील त्यानंतर सर्व जबाबदारी सरकारवर राहील असा गंभीर इशारा इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांच्या तर्फे देण्यात आला आहे असे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक समिती अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी प्रसिद्धी माध्यमांना सांगितले.

# किल्लेधारूर: प्रभाग 2 मध्ये मोफत आयुष्मान भारत आणि रेशन कार्ड घरपोच मिळणार

## अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त उपक्रम




**किल्लेधारूर:** ( प्रतिनिधी )

उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त जयसिंग भैय्या सोळंके सेवा प्रतिष्ठानतर्फे प्रभाग क्र. ०२ मधील नागरिकांसाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. २२ ते २६ जुलै २०२६ या कालावधीत चालणाऱ्या या उपक्रमात मोफत आयुष्मान भारत कार्ड, घरपोच रेशन कार्ड आणि ज्येष्ठ नागरिकांचा अपघाती विमा या सुविधा दिल्या जातील.

नागरिकांना रांगेत उभे राहावे लागू नये म्हणून आयोजकांचे प्रतिनिधी थेट घरी येऊन कागदपत्रे गोळा करतील. आयुष्मान भारत कार्डमुळे नागरिकांना अंगीकृत रुग्णालयांमध्ये दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत वैद्यकीय उपचार मिळतील.

लागणारी कागदपत्रे १) आधार कार्ड

२) १२ अंकी रेशन कार्ड क्रमांक ३) आधार लिंक असलेला मोबाईल नंबर मुख्य आयोजक नगरसेवक नितीन शिवाजीराव शिनगारे असून, अधिक माहितीसाठी अश्विन गुळवे (९७३०७२३०९८) रेहान शेख (९६९९१९३७९९) यांच्याशी संपर्क साधावा. या सुवर्णसंधीचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# वीरशैव लिंगायत समाजाच्या गुणवंतांसाठी शिष्यवृत्तीची सुवर्णसंधी

## सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाचा उपक्रम

**माजलगाव :** येथील सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाच्या वतीने यंदाही वीरशैव लिंगायत समाजातील दहावी आणि बारावीच्या ८५ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे, अशी माहिती विद्यमान मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. दरम्यान, दहावी आणि बारावी परीक्षेतील यशस्वी गुणवंतांचे श्री संस्थान मठातर्फे अभिनंदन करण्यात आले आणि मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी गुणवंतांना शुभाशीर्वाद दिले.

लिंगैक्य श्री गुरू तपोरत्न प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज माजलगावकर यांनी अनेक वर्षांपासून समाजातील गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली. यंदाही गुरूपौर्णिमेला या शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात येणार आहे. वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त करण्यासाठी दहावी किंवा बारावीच्या परीक्षेत ८५ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका आवश्यक असून सोबत आधारकार्डची प्रत येत्या दिनांक २६ जुलै २०२६ पर्यंत प्रत्यक्षात सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाच्या व्यवस्थापनाकडे द्यावेत, असे आवाहनही श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठ माजलगाव येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी घेतला महसूल अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा आढावा

## कामकाजात पारदर्शकता आणा, महसूल अधिकाऱ्यांना कडक निर्देश; खाजगी व्यक्तींचा हस्तक्षेप खपवून घेणार नाही



**बीड दि.17(जिमाका):** जिल्ह्यातील महसूल प्रशासन अधिक जनहिताभिमुख, पारदर्शक आणि उत्तरदायी बनविण्यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी कंबर कसली आहे. जिल्हा नियोजन सभागृहात आयोजित एका विशेष बैठकीत त्यांनी जिल्ह्यातील सर्व महसूल अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.

याप्रसंगी अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, आश्विनी सोनावणे, निवासी उपजिल्हाधिकारी सतिश सोनी यांच्यासह जिल्ह्यातील सर्व उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार आदि उपस्थित होते.

गावपातळीवरील समन्वय अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. तसेच नागरिकांना केंद्रबिंदू मानून प्रशासनाने अधिक गतिमानतेने काम करण्याचे निर्देश त्यांनी दिले. कार्यालयीन कामकाजात कोणत्याही खाजगी व्यक्तीचा हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नाही, असा दम जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिला. शासकीय कामात वापरले जाणारे युजर आयडी आणि डिजिटल स्वाक्षरी कोणत्याही परिस्थितीत खाजगी व्यक्तींच्या हाती देवू नये, अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांवर थेट कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला. यासोबतच, नागरिकांकडून शासनाने निश्चित केलेल्या शुल्काव्यतिरिक्त कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच क्षेत्रीय कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण ठेवून दंडात्मक वसुलीचा वेग वाढवावा, असेही सांगितले.

# परळी, अंबाजोगाईत ना. पंकजाताई मुंडेंचा हाऊसफुल्ल 'जनता दरबार'

## फेस टू फेस संवादाने जनता खुश ; लोकांच्या समस्यांचा तात्काळ निपटारा



परळी वैजनाथ दि. १७ -- राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांचा काल परळी व आज अंबाजोगाईत हाऊसफुल्ल 'जनता दरबार' झाला. समोरासमोर भेट होत असल्याने आणि प्रश्न लगेच मार्गी लागल्याने जनता खुश होत आहे.

परळीतील शासकीय विश्रामगृह आणि आज अंबाजोगाईतील जनसंपर्क कार्यालयात ना. पंकजाताईंचा जनता दरबार पार पडला. या जनता दरबारात सकाळपासूनच नागरिकांनी गर्दी केली होती. रस्ते, पाणीपुरवठा, वीज वितरण, महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणे आणि वैयक्तिक लाभाच्या योजना अशा विविध समस्या घेऊन नागरिक आले होते. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केवळ अर्ज स्वीकारले नाहीत, तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना लगेच फोन करून जागेवर प्रश्नांचा निपटारा केला.

**फेस टू फेस संवाद :**

जनता दरबारात ना. पंकजाताई मुंडे आलेल्या प्रत्येकाची समस्या नीट ऐकून घेत त्यावर लगेच तोडगा काढून फोन करतात, त्यांची ही शैली पाहून आपल्या समस्यांची गाऱ्हाणी घेऊन आलेल्या जनतेच्या चेहर्यावर समाधानाचे भाव उमटत होते. 'ताईंनी आमचं म्हणणं ऐकून घेतलं, फोन केला, आमचं काम झालं,' अशी भावना जनता दरबारात सहभागी नागरिकांनी व्यक्त केली. या जनता दरबाराला स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध विभागांचे शासकीय अधिकारी उपस्थित होत.

# किरण गित्ते IAS यांची मुख्यमंत्र्यांचे सचिव पदी नियुक्ती; परळीच्या सुपुत्रावर त्रिपुरा प्रशासनाची मोठी धुरा!




**परळी वैजनाथ ( प्रतिनिधी):** परळी तालुक्यातील सुपुत्र आणि त्रिपुरा केडरचे वरिष्ठ सनदी अधिकारी श्री. किरण गित्ते IAS यांच्यावर त्रिपुरा सरकारने अत्यंत मोठी आणि महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली आहे. त्रिपुराच्या राज्यपालांच्या आदेशानुसार (By order of the Governor) प्रशासकीय सेवेतील हा मोठा फेरबदल करण्यात आला असून, त्रिपुरा सरकारचे अवर सचिव जे. दत्ता यांच्या स्वाक्षरीने हे अधिकृत आदेश जारी करण्यात आले आहेत.

या नव्या नियुक्तीनुसार श्री. किरण गित्ते IAS यांच्याकडे आता थेट राज्याच्या मुख्यमंत्री सचिवालयाचा (Secretary to the Chief Minister) मुख्य कार्यभार सोपवण्यात आला असून, त्यासोबतच सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD), आरोग्य आणि कुटुंब कल्याण, माहिती व संस्कृती (ICA), सुशासन विभाग आणि उद्योग व वाणिज्य यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या खात्यांच्या सचिवपदाची धुरा देण्यात आली आहे. तसेच 'त्रिपुरा इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन' च्या मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) पदाचा अतिरिक्त प्रभारही त्यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. परळीसारख्या ग्रामीण भागातून जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर प्रशासकीय सेवेत सर्वोच्च पदावर पोहोचलेल्या किरण गित्ते साहेब यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा नेहमीच उमटवला आहे. एकाच वेळी राज्याचे मुख्यमंत्री सचिवालय, आरोग्य आणि सार्वजनिक बांधकाम यांसारखी महत्त्वाची आणि वजनदार खाती सांभाळण्याची जबाबदारी मिळाल्याने त्रिपुराच्या प्रशासनात त्यांचे वर्चस्व अधिक वाढले असल्याचे स्पष्ट होत आहे. त्रिपुराच्या राज्यपालांच्या स्वाक्षरीने निघालेल्या या अधिकृत आदेशानंतर, परळीच्या सुपुत्राला मिळालेल्या या बहुमानाबद्दल परळी वैजनाथ परिसरासह संपूर्ण बीड जिल्ह्यातील नागरिक, राजकीय, सामाजिक तसेच शैक्षणिक क्षेत्रातील विविध मान्यवरांकडून त्यांचे अभिमानाने कौतुक होत असून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

# गजानन महाराज पालखी सोहळ्यातील साखळीचोरीचा पर्दाफाश; तीन आरोपी जेरबंद

## सहा लाखांचे सोन्याचे दागिने हस्तगत



**अंबाजोगाई :** अंबाजोगाई पालखी सोहळा दिनांक 17 जुलै 2026 रोजी पार पडला. अंबाजोगाई येथे गजानन महाराज पालखी सोहळ्यानिमित्त मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी झालेली असताना दर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी), बीडच्या पथकाने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत दोन गुन्हे उघडकीस आणत तब्बल 59 ग्रॅम वजनाचे सुमारे सहा लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले असून तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. 10 जुलै 2026 रोजी गजानन महाराज पालखी सोहळ्यात दर्शनासाठी प्रचंड गर्दी होती. याच गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी भाविकांच्या गळ्यातील सोन्याची चैन व मिनी गंठण चोरून नेले होते. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 290/2026 व 293/2026 असे भारतीय न्याय संहितेच्या कलम 303 (2)अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले होते.

या दोन्ही गुन्ह्यांचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुरू केला. तपासादरम्यान तांत्रिक माहिती, गोपनीय सूत्रे व कौशल्यपूर्ण तपासाच्या आधारे आरोपींचा शोध घेण्यात यश आले.

गुन्हा क्रमांक 290/2026 मध्ये चोरीस गेलेली 48 ग्रॅम वजनाची सोन्याची चैन आरोपी विशाल संजय हाताळले (वय 28) व दत्ता विजय गायकवाड (वय 26, दोघेही रा. गांधीनगर, नाळवंडी रोड, बीड) यांनी गर्दीचा फायदा घेऊन चोरल्याचे निष्पन्न झाले. त्यांच्या ताब्यातून सदर सोन्याची चैन जप्त करण्यात आली.

तर गुन्हा क्रमांक 293/2026 मध्ये चोरीस गेलेले 11 ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण आरोपी अशोक बबन जाधव (वय 29, रा. शास्त्रीनगर, नाळवंडी रोड, बीड) याने चोरी केल्याचे उघड झाले. त्याच्याकडूनही चोरीस गेलेले मिनी गंठण जप्त करण्यात आले.

या कारवाईत एकूण 59 ग्रॅम वजनाचे सुमारे सहा लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले असून, त्यामुळे पालखी सोहळ्यातील दोन्ही चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषीकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड (स्थानिक गुन्हे शाखा, बीड), पोलीस निरीक्षक शरद जोगदंड (अंबाजोगाई शहर पोलीस ठाणे), पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारोती कांबळे, रामचंद्र केकान, सचिन सानप, सोमनाथ गायकवाड, गोविंद भताने, विकास राठोड, पोलीस अंमलदार सचिन आंधळे, चालक अतुल हराळे तसेच पांडुरंग काळे यांनी संयुक्तरीत्या पार पाडली.

# लोकनेते, माजी आमदार, कै.बाबुराव आडसकर यांना मरणोत्तर रोटरी भूषण पुरस्कार जाहीर



कै.बाबुरावजी आडसकर साहेब

**अंबाजोगाई :** रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने दिला जाणारा रोटरी भूषण पुरस्कार या वर्षी लोकनेते, माजी आमदार, कै. बाबुराव आडसकर यांना मरणोत्तर रोटरी भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.अशी माहिती रोटरीचे अध्यक्ष शकील शेख, सचिव राधेश्याम लोहिया यांनी दिली.

हा पुरस्कार वितरण समारंभ दिनांक २६ जुलै रविवार रोजी सायंकाळी पाच वाजता हॉटेल परिचय येथे होणार आहे. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आडसकर कुटुंबीयांचा सन्मान करण्यात येणार आहे.

मराठवाड्याच्या राजकारणात आपल्या कर्तृत्वाने आपले वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या लोकनेते, माजी आमदार कै. बाबुराव आडसकर यांनी पंचायत समितीचे सभापती ते विधानसभा असा ५० वर्षांचा राजकीय प्रवास केला. ५० वर्षाच्या सक्रिय राजकारणात त्यांच्या हाबाडयाचा धसका जिल्ह्यातील मोठमोठ्या पुढाऱ्यांनी घेतला होता. लोकांचे भोवतालचे वलय हीच त्यांच्या राजकारणाची खरी किमया होती. म्हणूनच बाबुराव आडसकर हे लोकनेते म्हणून जनतेच्या मनामध्ये अधिराज्य गाजवत होते.

केज तालुक्यातील आडस या गावचे बाबुराव आडसकर हे रांगडे व्यक्तिमत्व, शालेय जीवनापासूनच राजकारणाची त्यांना मोठी आवड होती. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाचा स्वीकार त्यांनी केला होता. यशवंतरावांची विचारधारा जोपासून बाबुराव आडसकर कॉंग्रेस पक्षात सक्रिय झाले. केज पंचायत समितीच्या निवडणुकीपासून १९६३ साली आपल्या राजकीय जीवनाचा प्रारंभ केला. ते केज पंचायत समितीचे सभापती झाले आणि पुढचे ५० वर्षे त्यांनी राजकारणात कधीही मागे वळून पाहिले नाही. विधानसभा, विधानपरिषद, शिखर बँकेचे संचालक, अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अशी अनेक महत्त्वपूर्ण पदे त्यांनी मोठ्या दिमाखाने भूषविली. राजकारणात सामान्य जनतेचा विश्वास आत्मसात करून सभोवती जनसामान्यांचा गराडा ही त्यांची राजकारणाची किमया त्यांना पुढे घेऊन गेली. आपल्या रांगडया व्यक्तिमत्वाने व लोकांना रुचेल अशा फड्र्या भाषणाने ते मोठमोठ्या सभा गाजवित असत. सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून त्याचे असेल ते काम करण्याची प्रवृत्ती त्यांना लोकप्रिय बनवत गेली. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना यावर्षीचा मरणोत्तर रोटरी भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन रोटरीचे अध्यक्ष शकील शेख, सचिव राधेश्याम लोहिया,उपाध्यक्ष कल्याण काळे, पुरस्कार समितीचे समन्वयक अनंत लोमटे यांनी केले आहे.

# आ.धनंजय मुंडे वाढदिवस : मोफत रक्त तपासणी व नेत्ररोग तपासणी शिबिराचा 992 नागरिकांनी घेतला लाभ-डॉ संतोष मुंडे



**परळी वैजनाथ (प्रतिनिधी...** : आ.धनंजय मुंडे यांच्या वाढिवसानिमित्त सर्वसामान्य नागरिकांसाठी दिव्यांग कल्याण अभियान मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ संतोष मुंडे यांच्या मुख्य आयोजनातून भव्य मोफत रक्त तपासणी आणि कॉम्पयुटराईजड नेत्ररोग तपासणी शिबिर आज श्रीनाथ हॉस्पिटल परळी वैजनाथ येथे संपन्न झाले

यासोबतच दिव्यांग,विधवा आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या विविध समस्यांचे निवारण करण्यासाठी तक्रार निवारण अभियानाचा उत्साहात प्रारंभ झाला. या प्रसंगी परळी वैजनाथ नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी,नेत्र रोगतज्ञ डॉ नम्रता ढवारे ,नगरसेवक सचिन सारडा,पद्मावती शिक्षण संस्थेचे सचिव दीपक तांदळे,आदी मान्यवर उपस्थित होते.

या रक्त तपासणी व नेत्र रोग तपासणी शिबिरामध्ये एकूण ९९२ नागरिकांनी आपली रक्त तपासणी व नेत्ररोग तपासणी करून शिबिराचा लाभ घेतला अशी माहिती शिबिराचे मुख्य संयोजक दिव्यांग कल्याण अभियान मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ.संतोष मुंडे यांनी दिली.

या रक्त तपासणी शिबिरामध्ये संपूर्ण रक्तगणना (CBC), रक्तातील तीन महिण्याचीसाखर(H-bA1c),थायरॉईड प्रोफाइल, व्हिटॅमिन डी,व्हिटॅमिन बी१२,सिरम कॅल्शियम या अतिशय महत्वाच्या १८०० किंमतीच्या रक्त तपासण्या मोफत करून घेतल्या.

त्याच बरोबर नेत्ररोग तपासणी शिबिरामध्ये सहभागी सर्व नागरिकांनी आपल्या डोळ्यांची संगणकाद्वारे (कॉम्प्यूटराइजड) नेत्ररोग तपासणी करून घेतली तसेच नेत्ररोग तज्ञ डॉ नम्रता ढवारे मॅडम यांचे डोळ्यांच्या आरोग्याबाबत अमूल्य असे मार्गदर्शन घेतले.

या शिबिराचा एक महत्वाचा भाग म्हणजे दिव्यांग,विधवा आणि ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्या व तक्रारींचे निवारण करण्यासाठी नियोजित विशेष मार्गदर्शन व तक्रार निवारण अभियानाचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

# देवगिरी प्रतिष्ठानतर्फे डॉ.अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

## विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : प्रा. प्रदीप रोडे

**बीड (दि १७) :** देवगिरी प्रतिष्ठान, बीडच्या वतीने साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राज्यस्तरीय शालेय व महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचे हे १७ वे वर्ष असून, ही स्पर्धा शनिवार, दिनांक ८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९:३० वाजता बीड येथील तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात पार पडणार आहे.

या स्पर्धेत वरिष्ठ (पदवी/ पदव्युत्तर) आणि कनिष्ठ (इयत्ता ८ वी ते १२ वी) अशा दोन गटांचा समावेश आहे. वरिष्ठ गटासाठी संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या जडणघडणीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे योगदान, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरवादी दृष्टिकोन आणि अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मानवतावादी पैलू हे विषय ठेवण्यात आले आहेत.

कनिष्ठ गटासाठी अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य मानवी कल्याणाचे आणि सामाजिक प्रबोधनाचे मार्गदर्शक, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यात प्रतिबिंबित झालेले स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाचे विचार आणि अन्याय व शोषणाविरुद्ध लढणारे अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यांतील संघर्षशील नायक व नायिका हे विषय निश्चित करण्यात आले आहेत.

# माध्यमिक शिक्षण विभागातील वेतन पथक अधीक्षक पद रिक्त

## हजारो शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे कामकाज ठप्प



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जुलै**

येथील वेतन पथक अधीक्षक (माध्यमिक) हे अत्यंत महत्त्वाचे पद गेल्या काही काळापासून रिक्त असल्यामुळे जिल्ह्यातील अनुदानित माध्यमिक शाळांच्या वेतन अनुदानाशी संबंधित कामकाजावर गंभीर परिणाम होत आहे. सदर पद रिक्त असल्याने विविध प्रस्ताव, मसुदे, प्रशासकीय पत्रव्यवहार, मंजुरीची प्रकरणे तसेच इतर महत्त्वाची कामे प्रलंबित राहिली असून शाळा, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व संस्थाचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिणामी वेतन पथकाशी संबंधित जवळपास सर्वच प्रशासकीय कामकाज प्रभावित झाले असून या प्रकरणी हिंगोली जिल्हा खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकेतर संघटनेतर्फे शिक्षणधिकारी माध्यमिक यांना निवेदन देण्यात आले आहे.

वेतन पथक अधीक्षक हेपद हे आहरण व संवितरण अधिकारी तसेच कार्यालय प्रमुख म्हणून कार्यरत असल्याने त्याचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. विशेषतः जुलै महिन्यात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वार्षिक वेतनवाढ, सेवा विषयक मंजुरी तसेच इतर आर्थिक बाबींवरील अंतिम मंजुरीसाठी वेतन पथक अधीक्षक यांची स्वाक्षरी आवश्यक असते. मात्र पद रिक्त असल्यामुळे या सर्व कामांमध्ये अनावश्यक विलंब होत असून त्याचा थेट परिणाम हजारो कर्मचारी व त्यांच्या कुटुंबांवर होत आहे.

विशेष म्हणजे, तत्कालीन वेतन पथक अधीक्षक राम लांडे यांना दि. ३० जून २०२६ रोजी कार्यमुक्त करण्यात आले. तथापि, त्याच दिवशी किंवा तत्काळ दुसऱ्या सक्षम अधिकाऱ्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविणे अपेक्षित असताना अद्यापपर्यंत कोणत्याही अधिकाऱ्याकडे हा कार्यभार सोपविण्यात आलेला नाही. परिणामी कार्यालयाचे दैनंदिन कामकाज, प्रशासकीय निर्णयप्रक्रिया तसेच आर्थिक मंजुरीची कार्यवाही प्रभावित झाली असून कार्यालय नियमित कार्यालय प्रमुखाशिवाय कार्यरत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

जिल्ह्यातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, संस्थाचालक तसेच हिंगोली जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकेत्तर संघटनांनी शासन व विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे वेतन पथक अधीक्षक (माध्यमिक) पदावर नियमित नियुक्ती करण्याची किंवा तत्पूर्वी सक्षम अधिकाऱ्याकडे तात्काळ अतिरिक्त कार्यभार सोपविण्याची मागणी केली आहे. अन्यथा वेतनवाढ, वेतन अनुदान, सेवा विषयक मंजुरी तसेच इतर आर्थिक कामांमध्ये होणाऱ्या विलंबामुळे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

प्रशासनाने या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेऊन त्वरित पर्यायी व्यवस्था करावी व नियमित नियुक्तीची कार्यवाही गतीने पूर्ण करावी.त्यामुळे प्रलंबित कामांना गती मिळून जिल्ह्यातील हजारो शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळेल. दरम्यान संबंधित वेतन अधीक्षक पद तात्काळ भरण्यासाठी शिक्षणाधिकारी माध्यमिक विपुल भागवत यांना हिंगोली जिल्हा खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकेतर संघटनेतर्फे निवेदन देण्यात आले असून हे पद त्वरित भरण्याची मागणी केली आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष गोपालराव सरनायक, जिल्हा उपाध्यक्ष संतोष गंगावणे, वसमत तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर जाधव, पांडुरंग भोयर, शेख अली, आकाश बांगर, गजानन वडकुते, कुंडलिक पाटील आदी उपस्थित होते.

# जलजीवन मिशन योजनेची कामे तत्काळ पूर्ण करा

## जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचे यंत्रणांना निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जुलै**

जलजीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात सुरू असलेल्या विविध नळ पाणीपुरवठा योजनांची कामे निर्धारित कालावधीत पूर्ण करून ग्रामीण भागातील नागरिकांना शुद्ध, सुरक्षित व नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी संबंधित यंत्रणांना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या नळ पाणीपुरवठा योजनांच्या कामांचा सविस्तर प्रगती आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी समृद्धी दिवाणे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता, संबंधित विभागांचे अधिकारी, जलजीवन मिशनचे अभियंते तसेच विविध यंत्रणांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या बैठकीत जिल्ह्यातील विविध नळ पाणीपुरवठा योजनांची सद्यस्थिती, प्रलंबित कामे, तांत्रिक अडचणी तसेच योजनांच्या कार्यान्वयनाचा सखोल आढावा घेण्यात आला. अंतिम टप्प्यात असलेल्या योजनांची कामे गतीने पूर्ण करून ग्रामीण नागरिकांना सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा लाभ मिळेल, यावर विशेष भर देण्यात आला.महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या डोंगरकडा, आरळ तसेच इतर पाणीपुरवठा योजनांच्या प्रलंबित कामांचा आढावा घेण्यात आला. याशिवाय पानकनेरगाव, जवळा बाजार, शिरड शहापूर आणि गोरेगाव येथील योजनांच्या प्रगतीचाही सविस्तर आढावा घेण्यात आला.

विद्युत जोडणीअभावी प्रलंबित असलेल्या सिरला, टाकळगव्हाण, तपोवन, फत्तेपूर, ब्राह्मणगाव, खापरखेडा, राजापूर, चिखली, वांझोळा, हिंगणी, मसोड, हिवरा तर्फे जवळा, शिवणी बु. आणि वरुड काझीसह अन्य गावांतील पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण झाली असून, आवश्यक विद्युत जोडणीची विहित प्रक्रिया तातडीने पूर्ण करून या योजना कार्यान्वित करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. सादर करण्यात आलेल्या नियोजनानुसार प्रत्यक्षात कामे पूर्ण होत आहेत की नाही, यावर नियमित देखरेख ठेवण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

बैठकीत जलजीवन मिशन अंतर्गत त्रयस्थ तांत्रिक तपासणी करण्यात आलेल्या योजनांचाही आढावा घेण्यात आला. तपासणीदरम्यान निदर्शनास आलेल्या त्रुटी, तांत्रिक उणिवा व प्रलंबित बाबींची तात्काळ पूर्तता करून त्याबाबतचा अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले.

# निपुण भारत अभियानांतर्गत ६० हजार विद्यार्थ्यांची चाळणी परीक्षा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जुलै**

निपुण भारत अभियानांतर्गत शिष्यवृत्ती व स्पर्धा परीक्षांसाठी गुणवंत विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना दर्जेदार मार्गदर्शन देण्यासाठी जिल्ह्यातील सुमारे ६० हजार विद्यार्थ्यांची चाळणी परीक्षा घेण्यात येणार असून, त्यातून निवड करण्यात येणाऱ्या चार हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, नवोदय व एनएमएमएस परीक्षांची विशेष तयारी करून देण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली निपुण भारत अभियानांतर्गत शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीसंदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) विपूल भागवत, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) आसावरी काळे, सर्व गट शिक्षणाधिकारी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) येथील अधिव्याख्याते तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांमधील गुणवंत विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी गणित व इंग्रजी विषयांवर आधारित चाळणी परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला. या परीक्षेतून चार हजार विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा आणि राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षांसाठी विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रभावी सरावासाठी पाच हजार प्रश्नांचा प्रश्नसंच तयार करण्यात आला असून, चालू शैक्षणिक वर्षात त्याचा नियमित सराव घेण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यात निपुण ३.० अभियान प्रभावीपणे राबविण्यात येणार असून, विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची सवय निर्माण करणे आणि त्यांची शैक्षणिक गुणवत्ता विकसित करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सांगितले. या बैठकीत चाळणी परीक्षेच्या आयोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या परीक्षेत जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी होतील, यासाठी सर्व गट शिक्षण अधिकाऱ्यांनी नियोजनबद्ध प्रयत्न करावेत, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. यावेळी जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये स्वच्छतागृहांची उपलब्धता आणि प्रगतीचाही आढावा घेण्यात आला.



हिंगोली- हिंगोली शहरासह जिल्ह्यात काही भागात मागील दोन दिवसांपासून हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडत असून या पावसामुळे हिंगोली ते अकोला राष्ट्रीय महामार्गावरील रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडे व शेती हिरवीगार दिसत असून या निसर्गरम्य देखाव्याचे छायाचित्र सुनील पाठक यांनी टिपले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### साहित्यरत्न अण्णाभाऊ साठेंना अभिवादन



हिंगोली- साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त हिंगोली येथे त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी नगरसेवक सुमित कांबळे व नगरसेवक रत्नाकर उर्फ खली बांगर यांनी साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य, शाहिरी आणि सामाजिक कार्यातून वंचित, शोषित व कष्टकरी समाजाला नवी दिशा दिली. त्यांच्या विचारांचा वारसा समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. स्मृतिदिनानिमित्त उपस्थितांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे स्मरण केले. सामाजिक समता, बंधुता आणि न्याय यांसाठी त्यांनी दिलेले योगदान सदैव प्रेरणादायी राहील, असे मत व्यक्त करण्यात आले. यावेळी नगर परिषद कॉलोनी येथील जयंती समितीचे अध्यक्ष सदस्य त्याच बरोबर सामाजिक कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कुरूंदा परिसरात पावसाअभावी पिके करपली



कुरूंदा- वसमत तालुक्यातील कुरूंदा परिसरात पावसाअभावी पिके करपू लागली. कुरुंदा व परिसरातील पिके पावसाअभावी सुकू लागली आहेत. मागील वीस दिवसापासून पावसाने दडी मारल्यामुळे शेत पिके वाळून जाण्याच्या मार्गावर आहेत. काही दिवसापूर्वी पेरणी योग्य पाऊस झाल्यामुळे परिसरातील सर्व गावात कापूस, सोयाबीन हळद व इतर पिकांची पेरणी मोठ्या प्रमाणात झालेली आहे. जमिनीत ओलावा असल्यामुळे कापूस व सोयाबीन पिके चांगल्याप्रकारे उगवली देखील होती. सोयाबीन हे पीक ओलावा असताना सुद्धा बऱ्याच शेतकऱ्यांचे बियाणे बोगस निघाल्यामुळे उगवले नाही. अनेक शेतकऱ्यांनी याबाबत कृषी विभागाकडे तक्रारीही केल्या आहेत. सोयाबीन बियाणे बोगस निघाल्यानंतर काही शेतकऱ्यांनी पुन्हा पेरणी केली. आता कसेबसे उगवलेले पीक पावसाअभावी वाळून जाण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे शेतकरी चांगलेच संकटात सापडले आहेत. शेतकरी पिकांना जीवदान मिळावे यासाठी आभाळाकडे डोळे लावून बसला आहे.

# राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण योजनेंतर्गत मार्गदर्शन शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जुलै**



राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई आणि प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी यांच्या वतीने 'संवाद -२०२५' योजनेअंतर्गत मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह क्रमांक २, तसेच आदिवासी मुलांचे वसतिगृह -१ हिंगोली येथे आयोजित या कार्यक्रमात वंचित, अनुसूचित, आदिवासी व विमुक्त भटक्या जमातींना न्याय सुलभ करून देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. तसेच नागरिकांमध्ये कायदेविषयक जनजागृती करून त्यांचे हक्क व अधिकार याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणीचे सचिव बी. एम. काळे यांनी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या विविध योजनांची माहिती दिली. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत नागरिकांना मोफत कायदेशीर मदत कशी मिळू शकते, याविषयीही सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच गरजू नागरिकांनी मदतीसाठी १५१०० या हेल्पलाईन क्रमांकाचा उपयोग करण्याचे आवाहन करण्यात आले.

या कार्यक्रमास सहाय्यक प्रकल्प अधिकारी रमेश भडके, गृहपाल श्री. दुबळकर, अच्युत बचाटे, तसेच आदिवासी वसतिगृहातील कर्मचारी व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व संबंधितांनी सहकार्य केले.

# मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण अभियान यशस्वीतेसाठी जनजागृती

## विद्यार्थ्यांकडून पालकांना पत्र पाठविणार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जुलै**

भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार यादी अद्ययावत करण्याच्या मोहिमेला व्यापक लोकसहभाग मिळावा, यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल गुप्ता यांनी जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये विशेष जनजागृती उपक्रम राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत.

या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील शासकीय, अनुदानित व खासगी शाळांमधील विद्यार्थ्यांमार्फत त्यांच्या पालकांना मतदार नोंदणी व पडताळणीबाबत जागृती करणारे पत्र पाठविण्यात येणार आहे. या पत्राद्वारे विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाचे महत्त्व समजावून सांगण्यात येणार असून, प्रत्येक कुटुंबाने गणनाकर्ता (बीएलओ) यांना आवश्यक सहकार्य करून गणना प्रपत्र अचूक भरावे, आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करावीत आणि मतदार यादी अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पालकांपर्यंत पोहोचणारा हा संदेश मतदार जनजागृतीसाठी प्रभावी ठरेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. भविष्यात मतदानाचा हक्क बजावणाऱ्या प्रत्येक नागरिकाची नोंद योग्य वेळी मतदार यादीत व्हावी, यासाठी आजच प्रत्येक कुटुंबाने आपली माहिती अचूक नोंदविणे आवश्यक आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी शिक्षण विभाग, सर्व मुख्याध्यापक आणि शिक्षकांना हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना दिल्या असून, विद्यार्थ्यांमार्फत पालकांना पत्र पोहोचवून मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण अभियान यशस्वी करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. या उपक्रमात जिल्ह्यातील सुमारे १ लाख विद्यार्थी सहभागी होणार असल्याचा अंदाज असून यासाठी शाळास्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

# हॉटेल, स्वीट मार्ट व किरकोळ विक्रेत्यांच्या नमुन्यांची तपासणी करा- जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जुलै**

जिल्ह्यातील नागरिकांना सुरक्षित, दर्जेदार व भेसळमुक्त अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने दि. १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत विशेष तपासणी मोहीम राबवून प्रमुख हॉटेल, स्वीट मार्ट व किरकोळ विक्रेत्यांच्या आस्थापनांवर धाडी टाकाव्यात तसेच अन्नपदार्थांचे नमुने तपासून दोषींवर कठोर कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आयोजित जिल्हास्तरीय सुकाणू समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी पोलीस उपअधीक्षक प्रेमप्रकाश माकोडे, जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयाचे प्रतिनिधी प्रसाद हजारे, जिल्हा पुरवठा अधिकारी अप्पासाहेब पाटील, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक रविंद्र पत्की, अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त पवनकुमार खताळ, अन्न सुरक्षा अधिकारी राजर्षी सावंत तसेच शिक्षण व आरोग्य विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी अन्न व्यवसायिकांच्या आस्थापनांची नियमित तपासणी करण्याच्या सूचना देताना प्रमुख हॉटेल व स्वीट मार्टच्या स्वयंपाकगृहांची, साठवण व्यवस्थेची, स्वच्छतेची आणि कचरा व्यवस्थापनाची सखोल पाहणी करण्यावर भर दिला. तपासणीदरम्यान अन्नपदार्थांचे नमुने घेऊन त्यांची प्रयोगशाळेत तपासणी करण्यात यावी तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, असे त्यांनी सांगितले.

तसेच तपासणी व धाडींच्या कारवाईचे व्हिडिओ चित्रीकरण करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. जिल्ह्यात अन्न सुरक्षा नियमांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी यासाठी जास्तीत जास्त धाडी व तपासणी मोहीमा राबविण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

# जलजीवनच्या विहीरीला पाणी नसल्यामुळे माळसेलू तहानलेले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जुलै**

तालुक्यातील माळसेलू येथे जलजीवन मिशन योजनेवर सुमारे १ कोटी ७९ लाख रुपये खर्च करण्यात आला. मात्र, योजनेत पाईप लाईनचे काम पूर्ण होऊनही गावकऱ्यांची पिण्याच्या पाण्यासाठीची वणवण कायम असल्याने या योजनेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

योजनेअंतर्गत चोरजवळा तलाव परिसरात पाणीपुरवठ्यासाठी विहीर खोदण्यात आली. मात्र, त्या विहिरीला आजपर्यंत पाणीच लागले नाही. तरीही पाईपलाईनचे काम पूर्ण करण्यात आले. विशेष म्हणजे पाण्याच्या टाकीचे काम देखील अपूर्ण आहे. आता गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी अधिग्रहित केलेल्या दुसऱ्या विहिरीतील पाणी जलजीवन मिशनच्या विहिरीत सोडून नळाद्वारे वितरण करण्यात येत आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, उपलब्ध होणारे पाणी पिण्यायोग्य नसल्याने अनेकांना आजही शुद्ध पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेवर कोट्यवधी रुपये खर्च होऊनही गावाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटलेला नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

दरम्यान, गावातील परिस्थिती लक्षात घेऊन युवा नेतृत्व अनिल देशमुख यांनी स्वतःच्या पुढाकारातून सकाळी व सायंकाळी मोफत पिण्याच्या पाण्याचा टँकर सुरू केला आहे. या उपक्रमामुळे विशेषतः महिला व ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, पिण्याच्या पाण्यासाठीची धावपळ काही प्रमाणात कमी झाली आहे.

ग्रामस्थांनी जलजीवन मिशन योजनेच्या कामाची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करण्याबरोबरच गावाला शाश्वत व शुद्ध पिण्याचा पाणीपुरवठा तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे.

# कब्रस्थानमधील मृतदेहांच्या कवट्या व हाडांची विक्री ?

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ जुलै -**

शहरातील जुना ईदगाह पाकिजा नगर येथील कब्रस्तान मधून कबरी खोदून मृतदेहाच्या कवट्या व हाडांची विक्री होत असल्याचा संशय परिसरातील नागरिकांनी व्यक्त केला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितावर गुन्हे दाखल करावे अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

जुना इदगाह पाकीजा नगर येथे मुस्लिम समाजाची दफनभूमी असून या ठिकाणी देगलुर नाका ते माळटेकडी तसेच नुरीचौक येथील मयतावर दफन विधी करण्यात येते. दरम्यान मागील शुक्रवारी नेहमीप्रमाणे काही नागरिक कब्रस्थान मध्ये आपल्या नातेवाईकांच्या कबरीवर श्रद्धांजली वाहण्यासाठी गेले असता त्यांना काही कबरी खोदल्याचे निर्दशनास



आले तर कब्रस्तान मधील एका कोपऱ्यामध्ये त्यांना जवळपास ३० ते ४० मानवी कवट्या व हातांची हाडे आढळून आली. त्यातच नव्याने दफन केलेल्या मृतदेहांचे देखील हाडे मिळुन आली. त्यामुळे कबरी खोदून तस्करीसाठी कवट्या व हाडे काढण्यात आली असावी असा संशय परिसरातील नागरिकांनी व्यक्त केला आहे. वैद्यकीय उत्पादने, वैद्यकिय अभ्यास तसेच दंत शस्त्रक्रिया करण्यासाठी यासाठी या हाडांचा वापर केला जातो. तसेच त्यातच जादूटोणा करण्यासाठी देखील कवटी व हाडांचा वापर करण्यात येत असल्याचा समज असल्याने या उद्देशाने कबरीतून हाडे काढले असावी असा संशय व्यक्त करत या ठिकाणी देखरेख करणाऱ्या अब्दुल मन्नान तसेच महापालिकेमार्फत शुल्क घेणाऱ्या सय्यद महेबंब अली याची चौकशी करावी अशी मागणी नागरिकांनी एका निवेदनाद्वारे जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केली असून या अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. हा धक्कादायक प्रकार उघड झाल्यानंतर या ठिकाणी देखरेखी साठी कामावर असलेले अब्दुल मन्नान हे काम सोडून गेल्याची माहिती देखील नागरिकांनी दिली.

# मोकाट जनावरांमुळे देगलूरमध्ये शाळकरी मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १८ जुलै -**

देगलूर शहरातील मोकाट जनावरांचा प्रश्न आता केवळ वाहतूक कोंडी, स्वच्छता किंवा बाजारपेठेतील अडथळा इतकाच राहिलेला नाही. तो थेट शाळकरी मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या जीवित सुरक्षिततेशी संबंधित गंभीर प्रश्न बनला आहे. शहरातील प्रमुख रस्ते, भाजीपाला मार्केट, बसस्थानके, शाळा व शिकवणी वर्ग परिसर आणि रहदारीच्या ठिकाणी कळपाच्या कळप मोकाट जनावरे मुक्तपणे फिरत असल्याने सध्या शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सकाळी शाळेकडे जाणारी व सायंकाळी/दुपारी घरी परतणारे विद्यार्थी, क्लासेसला जाणारी लहान-लहान मुले किंवा घरातील किरकोळ सामान आणण्यासाठी बाहेर पडलेली बालके... या प्रत्येकावर आज मोकाट जनावरांचा अदृश्य धोका घोंगावत असल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे. त्यामुळे पालकांनी सावधान राहण्याची अत्यंत गरज आहे. नाहीतर 'एक क्षणाचा निष्काळजीपणा... आणि आयुष्यभराची वेदना...' आपल्याही नशिबी येऊ शकते!

**पालकांनो! तुमचे मुलं जनावरांच्या विळख्यात तर नाही ना?**

रस्त्यावर अचानक उसळणारी, धावत सुटणारी किंवा एकमेकांवर धडकणारी जनावरे कोणाचाही विचार करत नाहीत. अशा वेळी त्यांच्या समोर एखादे लहान मूल आले, तर त्याला स्वतःचा बचाव करण्याची संधीही मिळत नाही. शहरात यापूर्वीही अनेक लहान-मोठ्या घटना घडल्याची माहिती नागरिकांकडून सांगितली जात आहे. विशेष म्हणजे नुकतेच रामपूर रोड परिसरात एका विद्यार्थिनीला मोकाट जनावराने धडक दिल्याची घटना घडली. सुदैवाने ती विद्युत खांबाच्या आड गेल्याने मोठा अनर्थ टळला. मात्र, हा इशारा प्रत्येक पालकांनी समजून घेण्याची अत्यंत आवश्यकता आहे. पालकांनो, तुमचे मूल शाळेत एकटे जाते का? क्लासेसला पायी किंवा सायकलवर जाते का? तुम्ही किराणा किंवा इतर सामान आणण्यासाठी मुलांना एकटे पाठवता का? जर याचे उत्तर होय असेल... तर आता अधिक सावध राहण्याची गरज आहे. कारण प्रशासनाकडून कायमस्वरूपी उपाययोजनेचा मुहूर्त निघेपर्यंत शहरात एखादी दुर्घटना घडू नये, याची जबाबदारी पालकांनो तुम्हीच घ्या!



**मोकाट जनावरांचा शहरातील डेंजर झोन!**

देगलूर शहरात सध्या कळपाच्या कळप मोकाट जनावरांचा संचार दिवसेंदिवस वाढतच आहे. यामुळे शाळकरी मुलांसह जेष्ठ नागरिक, महिला, भाजीपाला विक्रेते, ग्राहक, व्यापारी आणि वाहनचालकांना सर्वाधिक धोका निर्माण झाला आहे. सध्या मोकाट जनावरे शहरातील मुख्य रस्ते, उदगीर रोड, जुने बसस्थानक, रामपूर रोड, भक्तापूर रोड, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, नवीन बसस्थानक, लोहिया मैदान, भाजीपाला मार्केट, बँक ऑफ इंडिया, विविध शाळा, क्लासेस व शासकीय कार्यालय परिसरात मोठ्या प्रमाणावर मोकाट जनावरे फिरताना दिसतात. सध्या शहरातीत ही स्थानके मोकाट जनावरांची 'डेंजर झोन' निर्माण झाली आहेत.

**ज्येष्ठ नागरिक, महिला, वाहनचालक, व्यापाऱ्यांनाही त्रास**

या समस्येचा फटका केवळ विद्यार्थ्यांनाच बसत नाही. सकाळ-संध्याकाळ फिरायला जाणारे ज्येष्ठ नागरिक, दुचाकीस्वार, महिला, भाजीपाला विक्रेते, ग्राहक आणि शेतकरीही या मोकाट जनावरांमुळे त्रस्त झाले आहेत. अचानक उसळलेल्या जनावरालापासून जेष्ठ नागरिक दुर होणे, अत्यंत अवघड बाब आहे. बाजारात विक्रीसाठी ठेवलेल्या भाज्यांवर जनावरे तुटून पडतात, तर रस्त्यावरील मोकाट जनावरांमुळे वाहतूक कोंडी होत आहे. तसेच मोकाट जनावरे अचानक धावत आल्याने अनेकदा अपघात झाले आहेत पुढेही अपघाताची भीती कायम आहे.

**जनावरांचाही प्रश्न तितकाच गंभीर.**

एकीकडे भारतीय संस्कृतीत गायीला पूजनीय स्थान आहे; परंतु दुसरीकडे हीच जनावरे मोकाट फिरत असल्याने कचऱ्यातील प्लास्टिक, पिशव्या आणि घातक पदार्थ खाऊन त्यांच्या आरोग्यावरही गंभीर परिणाम होत आहेत. त्यामुळे हा प्रश्न केवळ नागरिकांच्या सुरक्षिततेपुरता मर्यादित नाही तर मुक्या जनावरांच्या आरोग्याचाही आहे.

**प्रशासनाला मोकाट जनावरांचा गंभीर प्रश्न दिसत नाही का?**

या प्रश्नावर अनेकदा बातम्या प्रसिद्ध झाल्या, नागरिकांनी तक्रारी केल्याचे सांगण्यात येते. मात्र आजही कायमस्वरूपी उपाययोजना झालेली दिसत नाही. देगलूर शहरात दिवसेंदिवस मोकाट जनावरांची समस्या वाढतच आहे. नगर परिषदेच्या मुख्याधिकारी निलम कांबळे, त्यांचे सहकारी अधिकारी व कर्मचारी यांना शहरातील अत्यंत गंभीर समस्या अजून कशी का दिसत नाही? याबद्दल नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. एखाद्या निष्पाप शाळकरी मुलाचा किंवा जेष्ठ नागरिकांचा जीव गेल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का? असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

**सत्ताधारी व विरोधी पक्षांनी एकत्रित प्रश्न मिठवावा!**

मोकाट जनावरांचा प्रश्न हा कोणत्याही एका पक्षाचा किंवा व्यक्तीचा नाही. हा प्रत्येक पालकाच्या काळजीचा, प्रत्येक विद्यार्थ्याच्या सुरक्षिततेचा आणि प्रत्येक नागरिकाच्या जीविताचा प्रश्न आहे. निवडणुकीपूर्वी सत्ताधारी व विरोधी पक्षातील नेत्यांनी शहरातील नागरिकांच्या विकासाच्या दृष्टीने आश्वासन दिले होते. आज देगलूर नगर परिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सत्ता आहे. विद्यमान नगराध्यक्षा सौ. विजयमाला बालाजी टेकाळे व उपनगराध्यक्ष ॲड. अंकुश देसाई देगावकर व नगरसेवक यांनी सत्ता स्थापनेपासून नागरिकांच्या विविध विकासात्मक भूमिका घेत आहेत. तर विरोधी पक्षातील काँग्रेसचे गटनेते मिरामोहियोद्दीन सालार व नगरसेवक यांनी नागरिकांच्या दृष्टिकोनातून महत्वाच्या समस्येकडे लक्ष वेधून घेतले आहे. दोन्ही पक्षांनी देगलूरकरांना विकास करण्याचे आश्वासन दिले होते. त्यामुळे मोकाट जनावरांचा गंभीर प्रश्न सत्ताधारी व विरोधी पक्षांनी एकत्रित प्रश्न मिठवावा! अशी नागरिकांची अपेक्षा आहे. विकासाच्या मोठमोठ्या घोषणा तेव्हाच अर्थपूर्ण ठरतील, जेव्हा शहरातील प्रत्येक मूल सुरक्षितपणे शाळेत जाईल आणि सुखरूप घरी परतेल.

## राष्ट्रीय महामार्गावरील धाब्यावर अवैध दारूची विक्री; कारवाईची मागणी

**हदगाव** -नांदेड - नागपूर राष्ट्रीय महामार्गावरती हदगाव तालुक्यातील मौजे गोजेगाव, वाकोडा व बेलगव्हाण या तिन्ही गावाच्या शिवारातील शेत जमिनीवर असलेल्या धाब्यावरती होत असलेली अवैध दारूच्या बेफाम विक्रीमुळे महिलांना व विद्यार्थ्यांना दररोजच्या होणाऱ्या त्रासामुळे संबंधित गावातील महिला आक्रमक होत पोलीस स्टेशन



वर थेट मोर्चा वळवत कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली असून अवैध दारू विक्रीचा हदगाव तालुका हब होत असल्याचा यानिमित्ताने बोलले जात आहे. हदगाव तालुक्याचा आणि अवैध दारू विक्रीचा तसा फार जुनाच नाते राहिलेला आहे. संबंधित राज्य उत्पादन शुल्क विभागाचे तर याकडे साफ दुर्लक्ष होत असल्याचा आरोप विशेषता महिला वर्गाकडून नेहमीच होताना दिसत आहे. तरी या सर्व घटनेच्या साक्षीदार महिला वर्ग आता चांगल्याच आक्रमक होताना दिसत असून याचे प्रत्यय आले आहे तालुक्यातील गोजेगाव, वाकोडा आणि बेलगव्हाण या गावातील महिलांनी या ठिकाणी असलेल्या धाब्यावरती सहज उपलब्ध होणाऱ्या दारूमुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना, शेतकऱ्यांना, महिलांना व विशेषता विद्यार्थिनींना याचा अमाप त्रास होत असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न देखील गंभीर होत चाललेला आहे तरी सदर प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन दारू विक्री करणाऱ्यास कायद्यानुसार कठोर कारवाईची मागणी करण्यात आली. यावेळेस निवेदन देताना महिलांची लक्षणीय उपस्थिती होती.

## शहरात पाच ब्लॉकची रचना, काँग्रेसचे व्यापक संघटन

**नांदेड** -आजलगत शहर पातळीवर नांदेड शहर व सिडको वाघाळा असे दोनच ब्लॉक असलेल्या काँग्रेस पक्षाने नुकतेच झालेल्या संघटन सृजन अभियानादरम्यान संघटन अधिक व्यापक करत पाच ब्लॉकची रचना केली आहे. दरम्यान प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या



मान्यतेनुसार प्रदेश काँग्रेस कमिटीने पाच ब्लॉक अध्यक्षांची नियुक्ती जाहीर केली आहे. नवनिर्वाचित शहर ब्लॉक अध्यक्षांचे खा. रवींद्र चव्हाण, उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार आदीसह सर्व काँग्रेस लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी अभिनंदन केले आहे. नुकतेच संपन्न झालेल्या संघटन सृजन अभियानादरम्यान, शहर पातळीवर संघटनात्मक रचनेत बदल करत दोन ऐवजी पाच ब्लॉकची रचना करण्यात आली आहे. प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने पाचही ब्लॉक अध्यक्षांच्या निवडी शुक्रवार (ता.१७) रोजी जाहीर करण्यात आल्या आहेत. प्रभाग एक ते पाचचा समावेश असलेल्या भाग्यनगर ब्लॉक अध्यक्षपदी प्रविण कानगुले, प्रभाग सहा ते दहाचा समावेश असलेल्या शिवाजीनगर ब्लॉक अध्यक्षपदी रमेश चित्ते, प्रभाग अकरा ते पंधराचा समावेश असलेल्या वजीराबाद ब्लॉक अध्यक्षपदी दीपकसिंग हुजारीया, प्रभाग सोळा ते आठराचा समावेश असलेल्या देगलूरनाका ब्लॉक अध्यक्षपदी अब्दुल रहीम तर प्रभाग एकोणवीस व वीसचा समावेश असलेल्या सिडको वाघाळा ब्लॉक अध्यक्षपदी बापूसाहेब पाटील यांची निवड करण्यात आली आहे. सर्व नवनिर्वाचित ब्लॉक अध्यक्षांचे खा. रवींद्र चव्हाण, उत्तर जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांच्या सर्व काँग्रेस लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी अभिनंदन केले आहे.

## स्वामी विवेकानंद महाविद्यालयास स्वामी विद्यापीठा कडून ओ श्रेणी प्राप्त

**मुक्रमाबाद** -अनुसया शिक्षण प्रसारक मंडळ गोजेगाव द्वारा संचलित मुक्रमाबाद येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयास आपली शैक्षणिक आणि प्रशासकीय क्षेत्रामध्ये गुणवत्ता सिद्ध केल्यामुळे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या वतीने ओ



श्रेणी प्राप्त झालेली आहे . सदरील महाविद्यालया च्या शैक्षणिक आणि प्रशासकीय क्षेत्राचे लेखा परीक्षण करण्यासाठी विद्यापीठाने एक तज्ञ समिती नियुक्त केली होती. या नियुक्त करण्यात आलेल्या तज्ञ समितीने महाविद्यालयाच्या मागील तीन वर्षाच्या शैक्षणिक व प्रशासकीय कार्याचे लेखापरीक्षण करून विद्यापीठाला अहवाल सादर केला होता. विद्यापीठाने नियुक्त केलेल्या तज्ञ समितीने महाविद्यालयातील विविध विभागांची शैक्षणिक वर्ष २०२५- २६ मध्ये लेखापरीक्षण केले होते. लेखापरीक्षणासाठी(अंकेक्षण) त्यांनी आवश्यक असलेल्या महाविद्यालयातील शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रातील कामकाज तसेच पायाभूत सोयी- सुविधा सह विद्यार्थ्यांसाठी राबविली जाणारी विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रम ,महाविद्यालयीन प्राध्यापकांचे संशोधन क्षेत्रातील कार्य इत्यादी सर्व बाजूंचे प्रामुख्याने लेखा परीक्षण केले. समितीने केलेल्या या लेखापरीक्षणा मुळेच विद्यापीठाकडून ग्रामीण भागातील या महाविद्यालयाला ९०.१३% गुण मिळाले. या गुणामुळेच महाविद्यालयास सर्वोत्कृष्ट ओ श्रेणी प्राप्त झाली आहे. महाविद्यालयाला मिळालेल्याओ या गुणांकन श्रेणीमुळे संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र पाटील गोजेगांवकर तसेच संस्थेचे सचिव माजी शिक्षण सभापती मा.व्यंकटरावजी पाटील गोजेगावकर साहेब व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विवेक इनामदार सर यांनी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

## आरक्षण उपवर्गीकरण विरोधात मोर्चे बांधणी; तर दुसरीकडे उपवर्गीकरणासाठी आमरण उपोषण






**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १८ जुलै -**

सिडको हडको परिसरात आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात बौद्ध बांधवांनी दिनांक १७ रोजी हडको येथील पंचशील बुद्ध विहार येथे सामाजिक कार्यकर्ते रमेश सोनाळे व अन्य समाज बांधवांच्या उपस्थितीत दिनांक ९ ऑगस्ट च्या महामोर्चा संदर्भात बैठक घेण्यात आली.

यावेळी सिडको - हडकोतील बौद्ध मातंग चामार यासह ५९ जातील समाज बांधव यांची उपस्थिती होती यावेळी दिनांक ९ ऑगस्ट रोजी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालय वर भव्य मोर्चा काढून आरक्षण उपवर्गीकरणाचे महत्त्व ६९ जातीमध्ये कसे आहे हे सरकारला व प्रशासनाला दाखवून देण्यासाठी या मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते बौद्ध बांधव रमेश सोनाळे, भरत कानिंदे, प्रशांत गोडबोले, राजू लांडगे, विलास गजभारे, चंपतराव कांबळे, सम्राट आढाव, सुभाष डोंगरे, केशव कांबळे, बा.रा. वाघमारे, प्रसेंजित वाघमारे, सुनील वडगावकर,प्रदीप हानवते , विठ्ठल गायकवाड, अमृता नरंगलकर, संजय निळेकर, डिके कांबळे, अनिल बेरजे, संतोष सावते, भीमराव बेरजे, भालेराव फौजी, राघोजी वाघमारे, भि.ना. गायकवाड, गौतम पवार, सिद्धार्थ पवार, एकनाथ वाघमारे, सौ. सुजाता आढाव, माधुरी ताई ,सूर्यवंशी ताई, सिंगनकर ताई, भिमाबाई पोवळे, कोकाटे मावशी, शोभा जाधव, सोनवणे ताई, सुनिता गायकवाड, जिजाबाई केळकर, गंगाबाई फकीरे, निलावती ताई, मीनाक्षी हनुमंते, दिपाली सोनसळे, विणकरे मावशी आदींची उपस्थिती होती.

तसेच दिनांक १८ जुलै रोजी अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथी दिनाचे औचित्य साधून ब्लॉक पँथर सामाजिक संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने अंकुश गायकवाड यांनी आरक्षण उपवर्गीकरणात अ ब क ड तात्काळ लागू करण्यात यावे तसेच अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार जाहीर करण्यात यावा ,अण्णाभाऊ साठे, लहुजी साळवे तसेच मातंग समाजाचा अपमान करणाऱ्यावर तात्काळ गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात यावी,अशा मागण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते अंकुश गायकवाड यांनी आमरण उपोषण अण्णाभाऊ साठे चौक येथे करण्यात आले आहे. या उपोषणास मातंग समाजातील सामाजिक राजकीय कार्यकर्ते माधव डोम्पले, आर जे वाघमारे, अंबादास मेकाले, संभाजी कांबळे, सुरेश कांबळे, जनार्धन गोपीले, पप्पू गायकवाड, विठ्ठल घाटे, मरीबा बसंवते ,रमेश तालीमकर, आनंदा वाघमारे, खंडू नघाडे, नितीन देडे, बाबुराव गायकवाड, आनंदा गायकवाड, आनंदा वाघमारे, नितीन वाघमारे, गुरुनाथ भांबळे, करण वाघमारे, ऋषिकेश दाढेल, शिवप्रसाद धोंगडे, माधव आंबटवार, उत्तम घोडजकर,बसवंते संभाजी, सचिन मांजरमकर, किशन वाघमारे, आनंदा झुंजारे, राजेश देवकांबळे, आदित्य थोरवे, विजय मोरे, शंकर धीरडीकर,मनोज नांदेडकर उपस्थित होते.

## राष्ट्रीय लाठी फेडरेशन कपमध्ये नांदेडचा दणदणीत विजय

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ जुलै -**

मार्शल आर्ट फेडरेशन ऑफ इंडिया आणि लाठी इंडिया ऑर्गनायझेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नवी दिल्ली येथील तालकटोरा इंडोर स्टेडियममध्ये आयोजित दुसऱ्या राष्ट्रीय लाठी फेडरेशन कप-२०२६ स्पर्धेत नांदेड जिल्ह्यातील बळीराम पूरच्या टायगर वॉरियर मार्शल आर्ट कुंफू कराटे अकॅडमी संघाने दमदार कामगिरी करत १८ सुवर्ण, ५ रौप्य आणि ७ कांस्य अशी एकूण ३० पदकांची कमाई केली.

स्पर्धेत विजय तेलंग यांनी २ सुवर्ण, अभिजीत डोईबळे यांनी १ सुवर्ण व १ रौप्य, रतन मगरे यांनी १ सुवर्ण व १ कांस्य, साईनाथ बिजापुरे यांनी १ सुवर्ण व १ कांस्य, मानव डोईबळे यांनी १ सुवर्ण व १ रौप्य, आदित्य गायकवाड यांनी १ सुवर्ण व १ कांस्य, लहुजी गवाले यांनी २ सुवर्ण, रुद्र आंबटवार यांनी १ सुवर्ण व १ कांस्य, महेश आंबटवार यांनी १ सुवर्ण व १ रौप्य, प्रावण्या तारू यांनी १ सुवर्ण व १ रौप्य, सागर शिरसे यांनी १ सुवर्ण व १ कांस्य, अक्षरा सोनकांबळे यांनी २ सुवर्ण, मनीषा इंगळे यांनी १ सुवर्ण व १ कांस्य, राणी जाधव यांनी १ सुवर्ण व १ कांस्य, तर दीपक गोटूमुकले यांनी १ सुवर्ण व १ रौप्य पदक पटकावत संघाच्या यशात मोलाचा वाटा उचलला.

या स्पर्धेसाठी खेळाडूंना मास्टर संघपाल भंडारे यांनी प्रशिक्षण व मार्गदर्शन केले. संघ व्यवस्थापक म्हणून शुभांगी गारोळे यांनी जबाबदारी सांभाळली, तर मेजर रवी डोईबळे यांनी संघाला मोलाचे सहकार्य केले.तसेच संघटनेचे अध्यक्ष दिगंबर एम् कदम यांनी शुभेच्छा दिल्या.

## किनवटमध्ये मातंग समाजाची व्यापक बैठक; २६ जुलै रोजी नवी तालुका कार्यकारिणी जाहीर होणार

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १८ जुलै -**

मातंग समाज संघटनेची पुनर्बांधणी करणे तसेच अनुसूचित जाती उपवर्गीकरणासंदर्भात पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्याच्या दृष्टीने समाजाचे ज्येष्ठ नेते मारोतराव सुंकलवाड यांच्या अध्यक्षतेखाली गोकुंदा येथील शासकीय विश्राम गृहात आज समाज बांधवांची एक व्यापक बैठक संपन्न झाली. या बैठकीत मातंग समाजाच्या विविध राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक प्रश्नांवर विस्तृत चर्चा करण्यात आली. तसेच आगामी २६ जुलै २०२६ रोजी मातंग समाज संघटनेची तालुकास्तरीय नवीन कार्यकारिणी गठीत केली जाणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.



प्रारंभी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतीदिनानिमित्त उपस्थितानी त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करून बैठीकीची सुरुवात करण्यात आली. यावेळी ज्येष्ठ कार्यकर्ते आडेलू बोनगीर, तुकाराम मजीदवार, शेकना गुंडावार यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी मातंग समाजाची सद्यस्थिती मांडत, हक्कांच्या प्राप्तीसाठी सर्वांनी मतभेद विसरून एकजूट होऊन लढा देण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक राज माहूरकर यांनी केले.

सूत्रसंचालन जनार्धन काळे यांनी तर मारोती गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या महत्त्वपूर्ण बैठकीला माजी नगराध्यक्ष के. मूर्ती, सुरेश घुम्मडवार, लक्ष्मीपती दोनपेल्लीवार, सुरेश साकपेल्लीवार, संतोष माहूरकर, अजय जागरलावार, नरेश माहूरकर, बालाजी बटूर, रवि उप्पलवार, गंगाधर नूतनीपेल्लीवार, किशोर बोलेनवार, लिंगन्ना कोत्तूरवार, डी. एम. बटूर, मारोती गायकवाड, बालाजी गायकवाड, तिरुपती मोक्कीनवार यांच्यासह विविध राजकीय पक्षांतील मातंग नेते, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. येत्या २६ जुलै रोजी मातंग समाज संघटनेची नवीन कार्यकारिणी गठीत होणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

**उपवर्गीकरणाद्वारे स्वतंत्र आरक्षण ही काळाची गरजः सुंकलवाड**

मातंग समाजाचे अनेक प्रश्न शासन दरबारी अजूनही प्रलंबित आहेत. या समाजाला इतर समाजांच्या तुलनेत मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सरकारने स्वतंत्रपणे सवलतींचे धोरण अवलंबिले पाहिजे. सरकारकडून हा समाज उपेक्षित राहत असेल, तर त्यासाठी आपण आपसातील सर्व मतभेद बाजूला ठेवून एकजूटपणे संघटित झाले पाहिजे. असे मारोतराव संकुलवाड म्हणाले.

## मुदखेड पोलिसांची अवैध रेती वाहतुकीवर मोठी कारवाई

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १८ जुलै -**

नांदेड जिल्ह्यात अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत मुदखेड पोलिसांनी मोठी कारवाई करत सुमारे ३० लाख २५ हजार रुपये किंमतीचा हायवा ट्रक व ५ ब्रास गौण खनिज रेती जप्त केली आहे. या प्रकरणी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून अवैध रेती माफियांविरोधातील पोलिसांची ही महत्त्वपूर्ण कारवाई मानली जात आहे.

टाकळी शिवारातील गोदावरी नदी परिसरातून अवैध रेतीची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यावरुन पोलिसांनी सापळा रचून एमएच-२६-बीई-९९०१ क्रमांकाचा हायवा ट्रक अडविला. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये अंदाजे ५ ब्रास गौण



खनिज रेती आढळून आली. चालकाकडे रेती वाहतुकीसाठी आवश्यक असलेली कोणतीही वैध परवानगी अथवा कागदपत्रे नसल्याचे स्पष्ट झाले.यानंतर पोलिसांनी संबंधित हायवा ट्रक (अंदाजे किंमत ३० लाख रुपये) व त्यामधील रेती (अंदाजे किंमत २५ हजार रुपये) असा एकूण ३० लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १३३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३०३(२) तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम ४७ व ४८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील चालक विजय मुरलीधर सुकळकर (वय २५ वर्षे, रा.कुरुंदा, जि. हिंगोली) याच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली असून वाहन मालक मुकुंद विलासराव देशमुख (रा. पावडेवाडी, नांदेड) याच्याविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास मुदखेड पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, उपविभागीय पोलीस अधिकारी माणिक बेंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण तसेच पोलीस अंमलदार दिलीप चक्रधर, सुनकुमवार, पिल्लेवार, सावते, म्हैसनवाड,यांच्या पथकाने केली.

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी बिलोली, ता. बिलोली यांचे कार्यालय**

**प्रकरण : जन्म नोंद घेणे बाबत.**

अर्ज/आवक क्र.२०१९/२०२६

**!! जाहीर प्रगटन !!**

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यास येते कि, अर्जदार देवकत्ते भगवान ग्यानोबा, वय ४० धंदा- शिक्षण रा. रामतीर्थ, ता. बिलोली यांनी या कार्यालयात हजर राहून जन्म मुत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधिल कलम ११ (२) व (३) अन्वये दि.२७/०४/२०२६ रोजी जन्म नोंद घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार देवकत्ते भगवान ग्यानोबा, रा. रामतीर्थ ता. बिलोली यांचा जन्म दि.०७/०७/१९८५ रोजीची नोंद ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय रामतीर्थ ता. बिलोली जि. नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबधितास कळविण्यात येते कि, देवकत्ते भगवान ग्यानोबा, यांच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पासुन पंधरा दिवसात या न्यायालयात स्वतः किंवा वकीला मार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

आज दिनांक २५/०५/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटण प्रसिध्द करण्यात येत आहे.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**बिलोली**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## फारोळा ग्रामपंचायत येथे SIR सर्वे



तभा वृत्तसेवा

**बिडकीन दि १७ :** पैठण तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय फारोळा अंतर्गत जि.प.प्रा.शाळा फारोळा येथे विशेष पुनरिक्षण कार्यक्रम (SIR) सर्वे व्यवस्थित चालू आहे.ग्रामपंचायत अधिकारी आशा तुपे, BLO ज्योती जवणे, वर्षा नवगिरे ,सहाय्यक गायत्री तुपे,मीनाक्षी धुमाळ,अनिता पटारे दिलीप गोरे,गणेश गायकवाड,तेजस जाधव,संजय धुमाळ,मंगेश धुमाळ,रविंद्र पवार ग्रामस्थ,मोठ्या संख्येने महिला गावकरी यांचा प्रतिसाद मिळत आहे.व उर्वरित फार्म ऑनलाईन करण्यासाठी लवकर कागदपत्रे जमा करावी असे आवाहन करण्यात आले

## गरजू विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून गणवेश भेट; साने गुरुजी विद्यालयाचा सामाजिक बांधिलकीचा उपक्रम



तभा वृत्तसेवा

**कन्नड :**दि.१७ जुलै - शिक्षणापासून कोणताही विद्यार्थी वंचित राहू नये, या उद्देशाने साने गुरुजी विद्यालयातील शिक्षकांनी सामाजिक बांधिलकी जपत इयत्ता पहिलीतील गरीब, होतकरू आणि गुणवंत विद्यार्थ्यांना मोफत गणवेशांचे दि.१७ रोजी वाटप केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. मिलिंद पाटील होते. यावेळी सचिव टी. एस. कदम, संचालिका मंगल गवते, संचालक नितीन पाटील, संस्था प्रतिनिधी हर्षदा कदम, मुख्याध्यापक धैर्यशील केरे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक भगवान ठाकरे तसेच ज्येष्ठ शिक्षिका आशा महाजन उपस्थित होत्या. विद्यालयातील शिक्षिका आशा महाजन, हर्षदा कदम, अलका जाधव तसेच शिक्षक बाबासाहेब सपकाळ, रावसाहेब वाकळे, ईश्वर मोरे आणि अन्य शिक्षकांनी स्वखर्चातून तसेच लोकसहभागातून निधी उभारून विद्यार्थ्यांसाठी गणवेश उपलब्ध करून दिले. या उपक्रमाबद्दल पालकांनी शिक्षकांचे कौतुक करत समाधान व्यक्त केले. यावेळी डॉ. मिलिंद पाटील यांनी शिक्षकांच्या सेवाभावी वृत्तीचे कौतुक करत, गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देणे ही समाजाप्रती असलेली जबाबदारी असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी शिस्त, सातत्य आणि मेहनतीच्या बळावर शिक्षणात प्रगती साधावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रंगनाथ शेळके यांनी केले, तर आभार श्रीराम जाधव यांनी मानले.

## ग्रीनफिल्ड 4-व्हीलर पॅसेंजर व्हेईकल सीटिंग सिस्टीम्स प्लांटचे भूमिपूजन

**छत्रपती संभाजीनगर – १८ जुलै २०२६:** ऑटोमोटिव्ह घटक आणि सिस्टीम्स निर्मितीमध्ये जागतिक स्तरावर आघाडीवर असलेल्या युनो मिंडा लिमिटेडने १५ जुलै २०२६ रोजी महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर (पूर्वीचे औरंगाबाद) येथे त्यांच्या अत्याधुनिक ग्रीनफिल्ड मॅन्युफॅक्चरिंग फॅसिलिटीचा (प्रकल्पाचा) भूमिपूजन सोहळा यशस्वीरित्या पार पाडला.हा प्रकल्प म्हणजे ऑटोमोटिव्ह सप्लाय चेन मधील सर्वाधिक मूल्य असलेल्या उत्पादन श्रेणींपैकी एक असलेल्या - संपूर्ण फोर-व्हीलर पॅसेंजर व्हेईकल सीटिंग सिस्टीम्स क्षेत्रात युनो मिंडाचा महत्त्वपूर्ण प्रवेश आहे. अंदाजे ३२० कोटी रुपयांचा प्रस्तावित भांडवली खर्च असलेला हा प्रकल्प आर्थिक वर्ष २०२८ च्या चौथ्या तिमाहीपर्यंत सुरू होण्याची अपेक्षा आहे.हा प्लांट युनो मिंडा ताची-एस सीटिंग प्रायव्हेट लिमिटेड' अंतर्गत उभारला जात आहे, जो जपानच्या आघाडीच्या ग्लोबल ऑटोमोटिव्ह सीटिंग उत्पादक ताची-एस कंपनी लिमिटेड सोबतचा एक संयुक्त उपक्रम आहे. हा विस्तार युनो मिंडासाठी ऑटोमोटिव्ह व्हॅल्यू चेनमध्ये एक धोरणात्मक झेप असून, यामुळे प्रति वाहन महसुलात लक्षणीय वाढ होईल. या धोरणाच्या यशाची पावती म्हणून, या संयुक्त उपक्रमाला आधीच एका प्रमुख ग्राहकाची ऑर्डर मिळाली आहे.

## आर्थिक वर्ष 2026-27 च्या पहिल्या तिमाही मध्ये 4,666 कोटीं रुपयांचे लाभ दिले

**मुंबई, 17 जुलै 2026:** आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्सने जून 2026 रोजी संपलेल्या आर्थिक वर्ष 2026-27 च्या पहिल्या तिमाहीत निव्वळ नफ्यात वार्षिक 27.8% वाढ नोंदवत 386 कोटीं रुपयांचा नफा कमावला. याच कालावधीत कंपनीच्या टर्म प्लॅन (रिटेल प्रोटेक्शन) व्यवसायात वार्षिक 60.4% वाढ झाली. तसेच, कंपनीच्या संचालक मंडळाने कंपनीचे नाव बदलून 'आयसीआयसीआय लाइफ इन्शुरन्स लिमिटेड' करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली.कंपनीचे एमडी आणि सीईओ अनुप बागची म्हणाले, " ग्राहकांना सर्वाधिक प्राधान्य देणे हा आमच्या धोरणाचा मुख्य भाग आहे. आर्थिक वर्ष 2026-27 च्या पहिल्या तिमाही मध्ये आमचा दावा निकाली काढण्याचा दर 99.3% राहिला.

## डॉ. देव पुन्हा डॉक्टर म्हणून हॉस्पिटलमध्ये परततो

सोनी सब वरील यादें प्रेक्षकांना उबदारपणा, विनोद आणि भावनिक क्षणांचा सुंदर संगम दाखवत आहे, ज्याची पार्श्वभूमी रुग्णालयातील जीवन आहे. डॉ. देव (इक्बाल खान) हळूहळू आपले आयुष्य पुन्हा उभारण्याचा प्रयत्न करत असताना, एक भावनिक टर्निंग पॉईंट त्याच्या वैयक्तिक प्रवासाला अनपेक्षित वळण देणार आहे. आगामी भागांमध्ये, डॉ. सनी (अनुराग शर्मा) वारंवार औषधांचा डोस वाढवून अंतिम मुलाखतीपूर्वी डॉ. देवला अपयशी करण्याचा प्रयत्न करतो. तरीही, डॉ. देव अखेर मुलाखत उत्तीर्ण होतो आणि अधिकृतपणे पुन्हा डॉक्टर म्हणून हॉस्पिटलमध्ये परततो,

## तत्त्वांपेक्षा घराला प्राधान्य देईल का

सोनी सब वरील पुष्पा इम्पॉसिबल आपल्या भावनिक कथानकामुळे प्रेक्षकांना सतत गुंतवून ठेवत आहे. पुष्पा (करुणा पांडे) पुन्हा एकदा आयुष्य बदलून टाकणाऱ्या आव्हानाला सामोरी जात आहे. नुकत्याच झालेल्या संकटातून सावरत असतानाच एक धक्कादायक सत्य तिच्या कुटुंबाच्या डोक्यावरचे छप्पर हिरावून नेण्याची वेळ आणते आणि त्यांच्या भविष्याला मोठा धोका निर्माण करते.



## आसराबाई सर्जेराव होले यांचे निधन

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १८ जुलै आसराबाई सर्जेराव होले वय (९०) रा बिडकीन ता पैठण यांचे दि १७ शुक्रवार रोजी ५.१५ वाजता वृद्धापकाळाने दुःखत निधन झाले असून तिच्या पार्थिवावर आज दि १८ शनिवार रोजी सकाळी दहा वाजता बिडकीन येथील शेकटा फाटा अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले, पश्चात, दोन मुलं दोन मुली सुना जावई नातवंड असा परिवार आहे.

# खुलताबाद येथील जर जरी बक्ष यांच्या 740 व्या उरुसाची जय्यत तयारी; जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नियोजनाचा आढावा



खुलताबाद प्रतिनिधी संतोष करपे. खुलताबाद येथे येत्या १७ ऑगस्ट पासून हजरत ख्वाजा शेख मुन्तजबोद्दीन जर जरी बक्ष यांच्या ७४० व्या उरूस यात्रेला प्रारंभ होत आहे.

या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयात शुक्रवारी (ता. १७) जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या अध्यक्षतेखाली उरूसाच्या पूर्वतयारीसंदर्भात महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली.

यात्रेसाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सोयी-सुविधा, सुरक्षा व्यवस्था आणि विविध विभागांच्या समन्वयाचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला.( बैठकीच्या प्रारंभी उरूस व्यवस्थापन समितीचे सदस्य तथा माजी नगराध्यक्ष ॲड. कैसरोद्दीन यांनी उरूस यात्रेदरम्यान आवश्यक असलेल्या विविध सुविधांबाबत प्रस्ताव मांडले.

भाविकांसाठी वाहतूक व्यवस्था, स्वच्छता, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा, वाहनतळ, वीजपुरवठा तसेच इतर मूलभूत सुविधांचे नियोजन प्रभावीपणे करण्याची मागणी त्यांनी केली

यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी उरूसासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयी-सुविधांमध्ये कोणतीही कमतरता राहू नये, यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करण्याचे निर्देश दिले.) आरोग्य सेवा, पिण्याचे पाणी, अखंडित वीजपुरवठा, स्वच्छतागृहे, एसटी बस सेवा, वाहतूक व्यवस्था आणि इतर आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या.

उरूसासाठी आवश्यक निधी, मनुष्यबळ आणि संसाधनांची उपलब्धता सुनिश्चित करण्याबरोबरच सार्वजनिक सुविधांवर विशेष भर देण्याचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. यात्रेदरम्यान स्वच्छता आणि आरोग्य व्यवस्थेबाबत कोणतीही तडजोड होऊ नये, अशी सूचनाही त्यांनी केली

उरूस काळात वाहनतळ, राहटपाळणे तसेच इतर मनोरंजनाच्या साधनांमुळे गर्दी वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन नियोजनबद्ध व्यवस्था उभारण्याचे निर्देश देण्यात आले. संवेदनशील ठिकाणी अतिरिक्त सुरक्षा व्यवस्था, आपत्कालीन यंत्रणा आणि आवश्यक मनुष्यबळ सज्ज ठेवण्यावरही भर देण्यात आला.

यंदा ७४० वा उरूस आणि श्रावण महिना एकाच कालावधीत येत असल्याने खुलताबादमध्ये वाहनांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. त्यामुळे पोलीस प्रशासन आणि प्रादेशिक परिवहन विभागाने वाहतूक व्यवस्थापनाचे प्रभावी नियोजन करावे, तसेच शहरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या वाढवून सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

यात्रा काळात आरोग्य विभाग, अन्न व औषध प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंचायत समिती, महावितरण, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, तहसील कार्यालय आणि खुलताबाद नगरपालिका यांनी परस्पर समन्वयाने काम करून यात्रा सुरक्षित, सुरळीत आणि शिस्तबद्ध पार पाडावी, जेणेकरून भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी ग्रामीण पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, उरूस व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा तहसीलदार संतोष गुट्टे, मुख्याधिकारी तथा समितीचे सचिव समीर शेख, नगराध्यक्ष सय्यद आमेर पटेल, पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, दरगाह कमिटीचे अध्यक्ष एजाज अहमद, उपाध्यक्ष इमरान जहांगीरदार, सचिव मोहम्मद मतीन, सदस्य सचिव कामरान अहमद तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीस दरगाह कमिटीचे सदस्य तथा माजी नगराध्यक्ष ॲड. कैसरोद्दीन, मुबशीरोद्दीन, सालेह मोहम्मद, हबीबोद्दीन, अबरार अहमद, कामरानोद्दीन यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी दरगाह कमिटीचे अध्यक्ष एजाज अहमद व सदस्यांनी उरूसासाठी प्रशासनाने केलेल्या नियोजनाबद्दल जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांचे आभार मानले.

बैठकीच्या शेवटी हजरत ख्वाजा शेख मुन्तजबोद्दीन जर जरी बक्ष (रह.) यांच्या ७४० व्या उरूस यात्रेचे नियोजन सुरक्षित, शिस्तबद्ध आणि भाविकाभिमुख पद्धतीने राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. सर्व संबंधित विभागांनी आपापल्या जबाबदाऱ्या वेळेत पूर्ण करून उरूस यशस्वी करण्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले.

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षेतेसाठी सपोनि दिनकर गोरे यांचे मार्गदर्शन

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१८ जुलै

**जिल्हा परिषद प्रशाला सोयगांव येथे नशामुक्ती व बालविवाह प्रतिबंध जनजागृती अभियान अंतर्गत पंधरवाड्याच्या निमित्ताने सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक दिनकर गोरे यांचे अमली पदार्थ विरुद्ध नशामुक्ती व बालविवाह प्रतिबंधात्मक विशेष मार्गदर्शन जनजागृती वर विशेष मार्गदर्शन पार पडले. शुक्रवार सकाळी १०:३०** वाजता नशा मुक्ती जनजागृती अभियान व बालविवाह मुक्ती व्याख्याना दरम्यान वरील विशेष निमंत्रित यांनी मुलांचे मार्गदर्शन केले. प्रत्यक्ष कृती वजा अभिनय करुन मुलांना हसतखेळत मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून जिल्हा परिषद प्रशाला शाळेचे मुख्याध्यापक दादाराव राठोड उपस्थित होते.तर सहाय्यक



पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांनी बालविवाह व अंमली पदार्थ सेवन व तंबांखू सेवन यांचे दुष्परिणाम विद्यार्थी यांना काका दीदी पथक यांनी गुड टच - बॅड टच,महिला विषयीचे कायदे,डायल 112,मोबाईलसोशल मीडिया अतिवापर परिणाम,सायबर गुन्हे,अमली पदार्थांचे दुष्परिणाम,मुला मुलींचे लहान वयात पळून जाण्याचे दुष्परिणाम,बालविवाह याबाबत माहिती देऊन मार्गदर्शन करण्यात आले. व तसेच विविध विषयांवर मार्गदर्शन केले.आपल्या परिसरातील व्यक्तींना व आपण स्वतः व्यसनांपासून दूर कसे राहावे याबाबत कृषिभूषण अरुण सोहणी यांनी विद्यार्थ्यांना प्रबोधन केले व्यसनाधीनतेमुळे कुटुंबावर होणारा परिणाम यांचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सोयगाव पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे व पोलीस कर्मचारी सादिक तडवी, प्रियंका बोडखे,माधुरी लोखंडे,कृषिभूषण अरुण सोहनी यांचा फुल गुच्छ देऊन सत्कार जिल्हा परिषद प्रशाला सोयगावचे मुख्याध्यापक दादाराव राठोड यांनी केले.तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भास्कर चौधरी यांनी केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन दौलतसिंग परदेशी केले.याप्रसंगी जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव शाळेचे शिवाजी नवले,संगीता सोनवणे,विद्याधर बागूल,राजेंद्र उंबरकर,तुकाराम पायघन,सचिन ढगे,शिवराम आगे,केंद्र शाळेचे मंगलताई बोरसे,विवेक महाजन यांचेसह प्रशालेचे व केंद्र शाळा सोयगाव सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## अण्णा भाऊ साठे यांच्या स्मृतीदिनानिमित्त भाजपतर्फे अभिवादन

### सामाजिक न्याय, समता आणि परिवर्तनाच्या विचारांचा वारसा जपण्याचा निर्धार

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या स्मृतीदिनानिमित्त भारतीय जनता पार्टी, छत्रपती संभाजीनगर शहरच्या वतीने विभागीय कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.



यावेळी उपस्थित मान्यवरांनी अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्य, समाजकार्य आणि परिवर्तनवादी विचारांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. वंचित, शोषित आणि कष्टकरी समाजाच्या प्रश्नांना आपल्या लेखणीतून आणि शाहिरीतून प्रभावीपणे मांडत त्यांनी सामाजिक समतेचा संदेश दिला. त्यांच्या विचारांतून सामाजिक न्याय, बंधुता आणि सर्वसमावेशक विकासाची प्रेरणा मिळते. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय आणि सन्मान पोहोचविण्याची दिशा अण्णा भाऊ साठे यांच्या कार्यातून मिळत असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

या अभिवादन कार्यक्रमास केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, भाजप शहराध्यक्ष किशोर शितोळे, शहर सरचिटणीस छाया खाजेकर, मंडळ अध्यक्ष निलेश धारकर, अनुसूचित जाती मोर्चाचे अध्यक्ष सचिन मिसाळ, नगरसेविका सुरेखा सानप, अमृता पालोदकर, सुनीता साळुंके, अमित देशपांडे, राहुल लोखंडे यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हॉटेलमध्ये थांबलेल्या खाजगी बस मधून पंचवीस लाख चोरी करणारे अटकेत

तभा वृत्तसेवा

**फर्दापूर :** छत्रपती संभाजीनगर - जळगाव महामार्गावर हॉटेल साई सुरूची लॉंजिग अँन्ड रेस्टॉरंट येथे खाजगी बस जेवणासाठी थांबली असून त्यातून पंचवीस लाख रोकड चोरीस गुरुवारी रात्री साडे आठ वाजता हॉटेल साई सुरूची लॉंजिग अँन्ड रेस्टॉरंट या वर हि खाजगी बस जेवणासाठी थांबली असता फिर्यादी नितीन पुरूषोत्तम वाणी वय 44 रा पारोळा ता पारोळा जिल्हा जळगाव हा इसम पंचवीस लाख रुपये रोकड ची बँग घेऊन कोल्हापूर येथून चांदी खरेदीसाठी जात असताना हि खाजगी बस फर्दापूर जवळील हॉटेल साई सुरूची लॉंजिग अँन्ड रेस्टॉरंट मध्ये जेवणासाठी थांबली असता अज्ञात व्यक्तीने लबाडीच्या हेतूने रोकड असलेली बँग चोरून नेल्याची घटना घडली फिर्यादी च्या सांगण्यावरून फर्दापूर



पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून छत्रपती संभाजीनगर पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या, अप्पर पोलीस अधीक्षक स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली फर्दापूर पोलिस स्टेशन चे सहा पोलीस निरीक्षक सुधीर मोटे,पी एस आय पाटील, पोलीस कर्मचारी जगदिश सोनवणे, निलेश लोखंडे, संतोष उबाळे, कृष्णा इंगळे, आकाश गवळे या पथकाने घटनास्थळी जाऊन पाहणी केली तसेच सि सि टि व्हि फुटेजचे विशेलषण, तांत्रिक पुरावे विविध प्रकारची माहिती तसेच संशयितांच्या हालचाली बारकाईने विशेलषण करून आरोपीच्या मागावर बारकाईने लक्ष ठेवून पुर्ण माहिती च्या आधारे जळगाव स्थानिक गुन्हे शाखेशी समन्वय साधण्यात आला या समन्वित तपासाच्या आधारे जळगाव पोलीस आरोपींना अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने जेरबंद केले त्यानंतर फर्दापूर पोलीस व जळगाव पोलीस यांच्या संयुक्त कारवाईत पुढील आरोपींना अटक करण्यात आले आरोपी सोनु राम भगवान सरवण,शेख रहेमान शेख ईसा, दशरथ सुरेश चौधरी, सचिन उर्फ मंगेश सुर्यकांत भामरे या चौघा आरोपी सह गुन्ह्यांमध्ये वापरलेली स्विफ्ट कार एम एच सी 7877 व पंचवीस लाख रुपये रोकड जप्त करण्यात आले आहे सदर गुन्हा दाखल होताच फर्दापूर पोलीस स्टेशनचे कर्मचारी व जळगाव पोलीस यांनी आंतरजिल्हा समन्वय साधून कमी वेळेत आरोपींना मुद्देमालासह पकडण्यात यश आले .

## इद्रिस मुलतानी यांच्या प्रयत्नाला यश; सोयगाव तालुक्यात शासकीय ज्वारी खरेदीचा प्रश्न मार्गी

तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.१८ जुलै :** रब्बी हंगामात सिल्लोड-सोयगाव तालुक्यात ज्वारीचे बंपर उत्पादन झाले होते.शासनाने दिलेले 10000 क्विंटल चे ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट पूर्ण झाले होते. मात्र तरीही शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणात ज्वारी शिल्लक असल्याने शेतकरी अडचणीत आला होता.

शेतकऱ्यांची ही व्यथा लक्षात घेऊन भारतीय जनता पार्टी अल्पसंख्याक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांनी मागील आठवड्यात राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची मुंबई येथे भेट घेतली होती.यावेळी त्यांनी सोयगाव तालुक्यासाठी पुन्हा 10000 क्विंटल चे अतिरिक्त उद्दिष्ट मंजूर करावे आणि खरेदीला मुदतवाढ द्यावी, अशी ठोस मागणी केली होती. मंत्र्यांनी यावर सकारात्मक आश्वासन दिले होते.

त्या आश्वासनाची पूर्तता आज झाली आहे.शासनाने सोयगाव तालुक्यासाठी अतिरिक्त ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट मंजूर केले असून, ३१ ऑगस्ट पर्यंत ज्वारी आणि बाजरी खरेदीला मुदतवाढ देण्यात आली आहे. या निर्णयामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.हमीभावाने शासकीय केंद्रावर ज्वारी विक्री करता येणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये आणि कष्टकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. इद्रिस मुलतानी यांनी सातत्याने शेतकऱ्यांच्या प्रश्नावर पाठपुरावा केल्याबद्दल शेतकऱ्यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

## गुजरात इंजेक्टची पहिल्या तिमाहीत दमदार झेप; उत्पन्नात 414% तर नफ्यात 1,600% वाढ

तभा वृत्तसेवा

**वडोदरा :** नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील गुजरात इंजेक्ट (केरळ) लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत उल्लेखनीय आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. कंपनीचे ऑपरेशनल उत्पन्न २.४२ कोटी रुपयांवरून १२.४५ कोटी रुपयांपर्यंत वाढले असून, यात ४१४ टक्क्यांची वाढ झाली आहे. करानंतरचा निव्वळ नफा (PAT) ७.३५ लाख रुपयांवरून १.२५ कोटी रुपयांवर पोहोचला असून, त्यात तब्बल १,६०० टक्क्यांची वाढ झाली आहे. प्रति शेअर उत्पन्न (EPS) ०.०५ रुपयांवरून ०.८६ रुपयांपर्यंत वाढले आहे.

३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीचे अनऑडिटेड आर्थिक निकाल संचालक मंडळाने मंजूर केले. तसेच कंपनीचे नाव बदलून रेजेनोव्हा रिन्युटेक लिमिटेड करण्याच्या प्रस्तावालाही मंजुरी देण्यात आली. कंपनीच्या स्वच्छ ऊर्जा व्यवसायातील विस्ताराचे हे प्रतीक मानले जात आहे.

संचालक मंडळाने मुरली शिवशंकरण नायर यांची तीन वर्षांसाठी व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती केली आहे. कंपनीचा सौर ऊर्जा पोर्टफोलिओ सातत्याने विस्तारत असून, मेहसाणा येथील ५ मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पासह विविध प्रकल्प यशस्वीपणे कार्यरत आहेत. पहिल्या तिमाहीतील मजबूत निकाल हे कंपनीच्या धोरणात्मक बदल, कार्यक्षम अंमलबजावणी आणि नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील वाढत्या उपस्थितीचे द्योतक असल्याचे व्यवस्थापकीय संचालक मुरली शिवशंकरण नायर यांनी सांगितले.

## डॉ.प्रमोद पवार यांना राष्ट्रीय शिक्षण रत्न पुरस्कार 2026 प्रदान



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.१८ जुलै :** संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील इंग्रजी विभागाचे सहयोगी प्राध्यापक,विभागप्रमुख, संशोधन मार्गदर्शक तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) संचालक डॉ.प्रमोद आंबादासराव पवार यांना शिक्षण, संशोधन, मूल्याधिष्ठित अध्यापन,शैक्षणिक नेतृत्व आणि साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'राष्ट्रीय शिक्षण रत्न पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला.

हा प्रतिष्ठेचा पुरस्कार दि.१२ जुलै २०२६ रोजी पुणे,महाराष्ट्र येथे आयोजित विशेष समारंभात SwiftNLift संस्थेतर्फे प्रदान करण्यात आला.शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य, नाविन्यपूर्ण अध्यापन,शैक्षणिक गुणवत्ता आणि राष्ट्रनिर्मितीतील मोलाच्या योगदानाची दखल घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला. पुरस्कार प्रमाणपत्रात डॉ. पवार यांचा "21st-Century Global Literary Critic" असा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला आहे.

डॉ.पवार यांनी इंग्रजी भाषा व साहित्य, संशोधन,संशोधन मार्गदर्शन,शैक्षणिक लेखन आणि गुणवत्ता वृद्धी उपक्रमांद्वारे उच्च शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. असून त्यांच्या शैक्षणिक योगदानाची विविध स्तरांवर दखल घेतली जात आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव चे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.आर.के. बारोटे,संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे,सचिव प्रकाश काळे, तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी डॉ.पवार यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक लौकिकात आणखी भर पडेल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ.प्रमोद आंबादासराव पवार यांनी हा सन्मान आपल्या विद्यार्थ्यांना,सहकारी प्राध्यापकांना, कुटुंबीयांना आणि हितचिंतकांना समर्पित करत उच्च शिक्षण,संशोधन,नाविन्यपूर्ण विचार आणि राष्ट्रनिर्मितीसाठी भविष्यातही अधिक जोमाने कार्यरत राहण्याचा संकल्प व्यक्त केला.

डॉ.पवार यांच्या या राष्ट्रीय सन्मानामुळे संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव तसेच संपूर्ण शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## कन्नडला पावसाचा दिलासा; दुपारच्या सरींमुळे उकाड्यापासून काहीसा आराम

तभा वृत्तसेवा

**कन्नड दि. १८ जुलै :** गेल्या काही दिवसांपासून उकाड्याने त्रस्त झालेल्या कन्नड शहरवासीयांना शनिवारी दुपारी झालेल्या पावसाने काहीसा दिलासा मिळाला. दुपारच्या सुमारास अचानक आकाश ढगांनी भरून आले आणि काही काळ मध्यम स्वरूपाच्या पावसाने शहराला झोडपले.

या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून, उष्णता व दमट हवामानापासून नागरिकांना काहीसा आराम मिळाला. पावसानंतर शहरातील प्रमुख रस्त्यांवर काही ठिकाणी पाणी साचल्याचे चित्र दिसून आले. दरम्यान, पावसामुळे बाजारपेठेत काही काळ नागरिकांची वर्दळ कमी झाली होती. शेतकरी वर्गानेही या पावसाचे स्वागत केले असून, खरीप पिकांसाठी हा पाऊस उपयुक्त ठरणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.